दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

आमदार राजन साळवी यांच्या पत्नी व मुलाचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर

दै,जनप्रभात राजापूर ता.प्रतिनिधी / प्रशांत पोवार

राजापूर: बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्या पत्नी व मुलाचा अटकपूर्व जामीन अर्ज उच्च न्यायालयाने मंगळवारी मान्य केला. लाचलुचपत विभागाकडून आमदार साळवी, पत्नी अनुजा साळवी (५०), मुलगा शुभम साळवी (२८,सर्व रा. खालची आळी रत्नागिरी) यांच्याविरुद्ध ३ कोटी ५० लाख रूपयांची बेहिशोबी मालमत्ता जमविल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.अटकेच्या भितीने शुभम व अनुजा साळवी यांच्याकडून यापूर्वी अटकपूर्व जामीनासाठी सत्र न्यायालयापुढे अर्ज दाखल करण्यात आला होता तो न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यामुळे या प्रकरणी आमदार साळवी यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. या अर्जावरील सुनावणीनंतर सोमवार १२ फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. मंगळवारी राजन साळवी यांची पत्नी आणि त्यांचा मुलगा शुभमच्या जामिन अटकपूर्व जामिन अर्ज उच्च न्यायालयाने मान्य केल्याने आमदार साळवी यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

* (आष्टी) वर्धा * बुधवार दि. १४/०२/२०२४ * वर्ष : २ * अंक : २६ * पाने : ८ * किंमत : ५ रु * मुख्य संपादक:- राहुल गजरे * उपसंपादक:- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादक:-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

निवडक महामुंबई

बोगस सोन्याचे दागिने तारण ठेवून बँकेची फसवणूक

मुंबई : बोगस सोन्याचे दागिने तारण ठेवून एका नामांकित बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी रमाकांत दिनकर भाटले या आरोपीला पाच महिन्यानंतर ओशिवरा पोलिसांच्या एका विशेष पथकाने अटक केली. अटकेनंतर त्याला अंधेरीतील लोकल कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अनिलकुमार करणसिंग बलियान हे हे एका नामांकित बँकेत मॅनेजर म्हणून कामाला असून सध्या त्यांची नेमणूक जोगेश्वरीतील शाखेत आहे. ऑक्टोबर २०२० रोजी रमाकांत भाटलेने बँकेतून व्यवसायासाठी गोल्ड लोनसाठी अर्ज केला होता. त्यानंतर त्याला बँकेने ५ लाख ६२ हजार रुपयांचे गोल्ड लोन दिले होते. त्यापैकी ७० हजार ३०२ रुपयांचा हप्ता त्याने बँकेत भरला, मात्र नंतर त्याने कर्जाचे हप्ते भरणे बंद केले होते. त्याने सादर केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करण्यात आली होती. यावेळी ते सर्व दागिने बोगस असल्याचे उघडकीस आले होते.

वृद्धाश्रमाच्या सहाय्यतेसाठी पुढाकार

मुंबई : भारतात पाच हजारांहून अधिक वृद्धाश्रम असले तरी अनेक वृद्धाश्रमांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आहे. आजही १८ दशलक्ष ज्येष्ठ नागरिक बेघर आहेत. वृद्धांची काळजी घेण्यामधील ही मोठी तफावत दूर करण्याच्या उद्देशाने डॉ. बत्राज फाऊंडेशनद्वारे नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण ऑडिटोरिअममध्ये 'यादों की बहार' या गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मश्री डॉ. मुकेश बत्रा यांच्यासह किरण व्ही. शांताराम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

३० कोटींची बनावट इंक टोनर्स, कार्ट्रिजेस जप्त

मुंबई : देशभरात नोव्हेंबर २०२२ ते ऑक्टोबर २०२३ या काळात सुमारे ३० कोटी रुपये मूल्याची बनावट एचपी उत्पादने जप्त करण्यात आली आहेत. एचपीच्या अँटि-काऊंटरफिटिंग अँड फ्रॉड (एसीएफ) अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. त्यापैकी मुंबईतून १ लाखांहून अधिक अवैध उत्पादने ताब्यात घेण्यात आली. या उत्पादनांमध्ये अनेक बनावट टोनर आणि इंक कार्ट्रिजेसचा समावेश होता. यापैकी बहुसंख्य कारवाया मुंबईत झाल्या आहेत. फेब्रुवारी २०२३ मध्ये मुंबई भागात एचपी प्रिंटर्सची बनावट कार्ट्रिजेस उत्पादित करण्याची आणि ती ऑनलाईन विकण्याची एक योजना प्राधिकरणांनी उधळून लावली. या कारवाईत २५,००० अवैध उत्पादने जप्त करण्यात आली.

'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' पुरस्काराचे आयोजन

मुंबई : क्विक हील फाऊंडेशनच्या सामाजिक उत्तरदायीत्व शाखेने पुणे येथे 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा पुरस्कार'च्या २०२४ पर्वाचे आयोजन केले. या समारोहामध्ये शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांना प्रशंसित करण्यात आले. यावेळी फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियत्री बहीणाबाई चौधरी नॉर्थ युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. व्ही. एल. महेश्वरी तसेच २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते.

मुंबईत १० टक्के पाणीकपात अटळ

आयुक्तांकडे प्रस्ताव सादर ; राखीव पाणीसाठ्यासाठी राज्य सरकारला पत्र

दै.जनप्रभात /मुंबई

गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा धरणक्षेत्रातील पाण्याच्या पातळीत प्रचंड घट झाली आहे. २० दिवसांचा पाणीसाठा कमी झाल्याने मुंबईवर जलसंकटाची चाहूल अशी बातमी दैनिक 'नवशक्ति'ने मंगळवारी प्रसिद्ध केली. त्यानंतर पालिका प्रशासनाने १० टक्के पाणीकपातीचा प्रस्ताव तातडीने तयार करत प्रशासक म्हणून आयुक्तांकडे मंजुरीसाठी सादर केला आहे. पुढील आठ दिवसांत आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर मार्च महिन्यापासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात येणार आहे. तसेच अप्पर वैतरणा धरणातून ९३ हजार ५०० दशलक्ष लिटर व भातसा धरणातून १ लाख ३७ हजार दशलक्ष लिटर राखीव पाणीसाठ्याची मागणी राज्य सरकारकडे पत्राद्वारे केली आहे.

मोडक सागर, मध्य वैतरणा, अप्पर वैतरणा, भातसा, तानसा, विहार व तुळशी या सात धरणांतून मुंबईला दररोज ३९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होतो. मुंबईची वर्षभराची तहान भागवण्यासाठी सातही धरणात १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासते. परंतु यंदा



सातही धरणांत ७ लाख १४ हजार ६१३ दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध आहे. हा पाणीसाठा जुलै अखेरपर्यंत मुंबईची तहान भागवेल इतका आहे. त्यात जून महिन्यापासून पावसाने हजेरी लावली नाही, तर मात्र मुंबईत पाणीबाणी परिस्थिती ओढवू शकते. त्यामुळे मुंबईत पाणीबाणी परिस्थिती टाळण्यासाठी आतापासून उपाययोजना करण्यात येत असून १० टक्के पाणीकपातीचा प्रस्ताव पालिका प्रशासकाकडे सादर केला आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर मार्च महिन्यापासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात येईल, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

गेल्या वर्षीही पावसाने धरणक्षेत्राकडे पाठ फिरवल्याने १ जुलैपासून १० टक्के पाणीकपात केली होती. परंतु ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस पडल्याने ८ ऑगस्टपासून पाणीकपात रद्द करण्यात आली होती. परंतु बदलत्या हवामानामुळे पाऊसही लहरी झाला आहे. त्यामुळे नियोजित वेळेत पावसाचे आगमन झाले नाही, तर पाणीबाणी परिस्थिती ओढवू शकते. त्यामुळे खबरदारी म्हणून १० टक्के पाणीकपात व राखीव पाणीसाठा मिळावा, यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू केल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

राखीव पाणीसाठ्यावर मुंबईची मदार

अप्पर वैतरणा धरणातून ९३ हजार ५०० दशलक्ष लिटर तर भातसा धरणातून १ लाख ३७ हजार दशलक्ष लिटर राखीव पाणीसाठ्याची मागणी करण्यात आली आहे. राज्य सरकारने राखीव पाणीसाठा उपलब्ध करून दिल्यास ऑगस्टपर्यंत मुंबईची तहान भागेल इतका पाणीसाठा उपलब्ध होईल.

१३ फेब्रुवारी रोजी धरणातील पाणीसाठा (दशलक्ष लिटर)

- अप्पर वैतरणा – १,८८,४०२
- मोडक सागर – ५५,०७७
- तानसा – ८३,५२२
- मध्य वैतरणा – १६,९६४
- भातसा – ३,४९,६७८
- विहार – १६,२३५
- तुळशी – ४७३४

तीन वर्षांत १३ ऑगस्टची स्थिती

- २०२४ – ७,१४,६१३
- २०२३ – ७,९३,७०७
- २०२२ – ८,२९,१८३

पीएम स्वनिधी योजनेंतर्गत निधी देण्यास विरोधकांचा विरोध

मुंबई : पीएम स्वनिधी योजनेच्या तसेच पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत महिला, अपंग आणि तृतीयपंथ लाभार्थ्यांना आर्थिक मदतीचा हात पालिका प्रशासनाने पुढे केला आहे. यासाठी पालिका प्रशासनाने तब्बल ६० कोटींचा निधी राखून ठेवला आहे. मात्र पीएम स्वनिधी योजनेंतर्गत पालिकेचा पैसा देण्यास विरोधी पक्षाने विरोध केला आहे.

पंतप्रधान स्वनिधी योजनेतून फेरीवाले आणि रस्त्यावरील विक्रेत्यांना त्यांचे व्यवसाय वाढवण्यासाठी १० हजार रुपये कर्ज देण्यात येते. लाभार्थ्यांनी पहिल्या कर्जाची परतफेड केल्यानंतर, त्यांना २० हजार आणि नंतर ५० हजार रुपयांचे कर्ज घेण्यास पात्र होतात. किमान एक लाख लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या प्रयत्नांना चालना देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

उपेक्षितांना निधी देण्याची योजना पालिकेने आखली आहे. मात्र निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मदत केली जात आहे. नागरी सुविधा पुरविणे, नागरिकांसाठी विकासाचे प्रकल्प राबविणे हे पालिकेचे कर्तव्य आहे. मात्र मुंबईकरांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा अपुऱ्या पडत असल्याचा आरोप आमदार रईस शेख यांनी यांनी केला आहे.

पालिका रुग्णालयात प्रथमच बायोमिथेनेशन प्लांट

मुंबई : पालिका रुग्णालयातील कॅन्टीनमध्ये निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करत बायोगॅसची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठी केईएम, सायन, नायर, राजावाडी व क्षयरोग रुग्णालयात पहिलाच बायोमिथेनेशन प्लांट उभारण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महापालिका तब्बल ९ कोटी रुपये खर्च करणार असून गॅसचा वापर उपहारगृहात करण्यात येणार आहे.

कचरामुक्त मुंबईसाठी मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. पालिकेच्या सर्वच रुग्णालयांमध्ये कॅन्टीन असून रुग्णालय परिसरात कर्मचारी, डॉक्टर, परिचारिकांच्या वसाहती आहेत. या ठिकाणी टाकाऊ अन्नपदार्थ, भाजीपाला व अन्य दररोज हजारो किलो ओला कचरा निर्माण होतो. हा कचरा थेट डम्पिंग ग्राऊंडवर जातो. या कचऱ्यावर रुग्णालयांच्या आवारातच प्रक्रिया करून त्यापासून बायोगॅस निर्माण करण्यात येणार आहे. प्रत्येक रुग्णालयात दोन मेट्रिक टन क्षमतेचा प्लांट उभारला जाणार आहे.

पालिकेने या प्रकल्पासाठी राबविलेल्या निविदा प्रक्रियेत एकूण चार कंत्राटदारांनी भाग घेतला होता. त्यापैकी एअरोकेअर एव्हिएशन सर्व्हिसेस या कंत्राटदाराला ९ कोटी १२ लाख रुपयांत हे काम देण्यात आले आहे.

उपहारगृहातील कचऱ्यावर प्रक्रिया

उपहारगृहात गॅसचा वापर

केईएम, सायन, नायर, राजावाडी रुग्णालयात प्रकल्प

पालिका ९ कोटी रुपये खर्च करणार



वीज व पैशांची बचत!

रुग्णालयात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करत बायोगॅसची निर्मिती केली जाणार आहे. विशेष म्हणजे बायोगॅसचा वापर रुग्णालयातील उपहारगृहात केला जाणार आहे. यामुळे कचरा संकलन आणि प्रक्रियेचे विकेंद्रीकरण होईल, तसेच कचरा वाहतुकीचा खर्च व स्वयंपाकासाठी लागणारा खर्चही कमी होईल. रुग्णालयातील ओला कचरा कमी पडल्यास संबंधित वॉर्ड, विभागातील हॉटेल व अन्य ठिकाणांहून मिळवला जाईल, अशी माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

मॉरिसच्या बॉडीगार्डला न्यायालयीन कोठडी

अभिषेक घोसाळकर हत्या प्रकरण



मुंबई : शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे निकटवर्तीय माजी आमदार विनोद घोसाळकर यांचा माजी नगरसेवक मुलगा अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या मॉरिस नोरोन्हा ऊर्फ मॉरिसभाई याचा बॉडीगार्ड अमरेंद्र अशोककुमार मिश्रा याला लोकल कोर्टाने २६ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

अमरेंद्रला मंगळवारी दुपारी पोलीस बंदोबस्तात किल्ला कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी कोर्टाने त्याची पोलीस कोठडी न वाढविता त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. गेल्या आठवड्यात अभिषेक घोसाळकर यांची मॉरिसने त्याच्या कार्यालयात गोळ्या झाडून हत्या केली होती. या हत्येनंतर त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली होती. हा संपूर्ण प्रकार फेसबुक लाईव्ह सुरू असताना झाला होता. त्यामुळे पोलिसांनी मॉरिसविरुद्ध हत्येसह आत्महत्येचा गुन्हा नोंदविला होता. या गुन्ह्यांचा तपास नंतर गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. हा तपास हाती येताच मॉरिसचा बॉडीगार्ड असलेल्या अमरेंद्र मिश्रा याला पोलिसांनी अटक केली होती. याच गुन्ह्यांत तो सध्या पोलीस कोठडीत होता.

त्याच्या पोलीस कोठडीची मुदत संपत असल्याने त्याला मंगळवारी दुपारी किल्ला कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी पोलिसांच्या वतीने अमरेंद्रच्या पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली होती. कट शोधण्यासाठी पुढील तपास बाकी आहे, या गुन्ह्यांत तो लाभार्थी आहे का, त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का, याचा तपास करण्यासाठी आणखीन पोलीस कोठडीची आवश्यकता असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. मात्र अमरेंद्रच्या वकिलांनी त्याला आक्षेप घेत पोलीस कोठडीत असताना अमरेंद्रने त्याच्याकडील सर्व माहिती पोलिसांना दिली आहे. त्यामुळे त्याच्या पोलीस कोठडीची मागणी करणे चुकीचे असल्याचे सांगून त्याला न्यायालयीन कोठडी मिळावी, अशी विनंती केली होती. दोन्ही युक्तिवाद ऐकल्यानंतर अमरेंद्रला २६ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले.

राज्य पोलीस दलातील १८ उपायुक्तांच्या बदल्या

अकबर पठाण यांची अभियान, दत्ता नलावडे-विशाल ठाकूर गुन्हे शाखेत

मुंबई : राज्य पोलीस दलातील १८ पोलीस उपायुक्तांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. सोमवारी सायंकाळी उशिरा गृहविभागाकडून १८ पोलीस उपायुक्तांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या. त्यात परिमंडळ-३चे पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांची अभियान, परिमंडळ नऊचे पोलीस उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय यांची परिमंडळ तीन, परिमंडळ-१०चे पोलीस उपायुक्त दत्ता नलावडे यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.

परभणी पोलीस अधीक्षक रागसुधा आर यांची अंमलबजावणी गुन्हे शाखा, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त समाधान पवार यांची मध्य विभाग-वाहतूक विभाग, ठाण्याचे नागरी हक्क संरक्षण विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांची ताडदेव दोन सशस्त्र विभाग, पुणे ग्रामीण विभागाचे पोलीस अप्पर पोलीस अधिक्षक यांची पश्चिम उपनगर वाहतूक विभाग, अकोला पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य दत्तात्र बापू कांबळे यांची विशेष शाखा एक, पुणे ग्रामीण बारामती विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक आनंद भोईटे यांची परिमंडळ अकरा, नागपूर लोहमार्ग विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली शिंदे यांची वरळी सशस्त्र पोलीस तीनमध्ये बदली करण्यात आली आहे.

मुख्यालय दोनच्या पोलीस उपायुक्त तेजस्वी सातपुते यांची परिमंडळ पाच, विशेष कृती दलाचे पोलीस उपायुक्त मंगेश शिंदे यांची परिमंडळ दहा, गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त राजतिलक रोशन यांची परिमंडळ नऊ, संरक्षण विभागाचे उपायुक्त महेश चिमटे यांची मुख्यालय एक, अभियान विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांची गुन्हे शाखा एक, सुरक्षा विभागाचे उपायुक्त शाम घुगे यांची अमली पदार्थविरोधी पथक, सशस्त्र पोलीस ताडदेव विभागाचे उपायुक्त प्रज्ञा जेडगे यांची दक्षिण वाहतूक विभाग म्हणून नियुक्ती झाली आहे.

ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत व्यवसायांना प्रोत्साहन

मुंबई : ईज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत मुंबई महापालिका व्यवसायांना प्रोत्साहन देणार आहे. यामुळे पालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांत परवाने देण्याच्या प्रक्रियेत सुलभता येईल.

२४ विभाग कार्यालयांत परवाने वितरण प्रक्रिया सुलभ

व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रक्रिया तातडीने केल्या जातील, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

व्यवसाय सुलभता म्हणजेच ईज ऑफ डुईंग बिझनेस, त्याअंतर्गत विभाग स्तरावर दिले जाणारे सर्व परवाने सुलभीकरणाची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. 'अनुपालन सुलभता', 'देखरेख सुलभता' आणि 'सेवा वितरण सुलभता' हे गेल्या वर्षी मंजूर झाले आहेत. व्यवसाय सुलभतेसाठी अद्ययावत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. नागरिकांसाठी सर्वसमावेशक अशी नियमपुस्तिकाही तयार करण्यात येत आहे. व्यवसाय व नागरी सेवा वितरीत करण्यात या प्रणालीची परिणामकारकता लवकरच दृश्य स्वरूपात येईल, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

सिंहगड एक्स्प्रेसमधून मुलीच्या अपहरणाचा डाव फसला

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून शाबासकी

मुंबई : 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलीस दलाचे ब्रीद आपल्या कर्तव्यबुद्धीने जपणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक बलभीम ननवरे यांचा मंगळवारी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनातील त्यांच्या दालनात पुष्पगुच्छ, शाल आणि अभिनंदन पत्र देऊन सन्मान केला.

काही दिवसांपूर्वी सिंहगड एक्स्प्रेसने पुण्याला कोर्ट कामासाठी जात असताना त्यांना रेल्वेच्या डब्यात ३० वर्षीय इसम एका ८ वर्षीय मुलीला घेऊन प्रवास करत असताना दिसला. ननवरे यांच्या नजरेतून या ३० वर्षीय इसमाच्या संशयास्पद हालचाली सुटल्या नाहीत, मुलगी मराठीमध्ये बोलत होती तर तो इसम हिंदीमधून बोलत होता. ननवरे यांनी आपल्या पोलीस स्टाइलने खाक्या दाखवताच, तो ३० वर्षीय इसम म्हणजे दयानंदकुमार शर्माने ही आपली मुलगी असल्याचे सांगितले. मात्र मुलीला आपल्या मामाचा मोबाईल नंबर तोंडपाठ असल्याने ननवरे यांचे काम सोपे झाले.

त्यांनी तत्काळ मुलीचे मामा सचिन शेलार यांच्याशी संपर्क साधला. मामांनी आपल्या बहिणीशी संपर्क साधून माहिती घेतली आणि ननवरे यांना आपली भाची पळवून नेली जात असल्याचे तत्काळ कळविले. मामांना पुणे स्टेशनवर बोलावण्यात आले आणि आरोपी शर्मा यांचा मुलीस पळवून नेण्याचा डाव सतर्कतेमुळे उधळला गेला. याबाबत डॉ. गोऱ्हे यांनी ननवरे यांनी केलेल्या सन्माननीय कामाबाबत लेखी अभिनंदनाचे पत्रही लिहिले. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या मुलांबाबत पालकांनी जागरूक रहावे व अनोळखी व्यक्तीसोबत त्यांना शाळेत अथवा घराबाहेर पाठवू नये, असे आवाहनही केले आहे.

चेंबूर अमर महल उड्डाणपुलाखाली शाळा भरणार ; अद्ययावत शैक्षणिक सुविधा

बेघर मुलांसाठी मुंबईत प्रथमच सिग्नल शाळा



मुंबई : शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार असून त्यासाठी विविध स्तरावर विविध प्रयत्न केले जात आहेत. आता बेघर मुलांसाठी मुंबईत प्रथमच सिग्नल शाळा सुरू करण्यात येणार आहे. चेंबूर येथील अमर महल उड्डाणपुलाखाली शाळा भरणार असून तब्बल १०० मुलांना शिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून शाळा सुरू करण्यात येणार आहे.

पूर्व उपनगरात बेघर मुलांसाठी झालेल्या सर्वेक्षणानुसार चेंबूर येथील अमर महाल येथे पालिकेच्या नियोजन विभागाने सिग्नल शाळेसाठी जागा शोधली. या शाळा उभारणीसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. शाळेमध्ये अत्यावश्यक साधनसामुग्री, विज्ञान प्रयोगशाळेतील उपकरणे आणि साधनसामुग्री, संगणक, प्रिंटर्स तसेच शाळेशी निगडित इतर बाबींचा पुरवठा करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिली.

स्थलांतरित किंवा बेघर कुटुंबीय आणि लहान मुले ही प्रसंगी उदरनिर्वाहासाठी वाहतूक दिवे (सिग्नल), उड्डाणपुलाखाली तसेच चौकाच्या ठिकाणी उघड्यावर वास्तव्य करत असल्याचे आढळते. समर्थ भारत व्यासपीठ स्वयंसेवी संस्थेने २०१८ मध्ये ठाणे येथील तीनहात नाका येथे सिग्नल शाळा सुरू केली होती. याच धर्तीवर मुंबईत पूर्व उपनगरात एक सिग्नल शाळा उभारण्यासाठी पालिकेच्या नियोजन विभागाने पुढाकार घेतला. साधारणपणे ६० ते १०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची ही शाळा असेल. त्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. अद्ययावत सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या शाळांच्या माध्यमातून करण्यात येईल, अशी माहिती संचालक (नियोजन) डॉ. प्राची जांभेकर यांनी दिली.

कौशल्य विकास मंत्र्यांची कल्पना

राज्याचे कौशल्य विकास उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा पालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबईतील बेघर मुलांसाठी शैक्षणिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज व्यक्त केली होती. त्या अनुषंगानेच नाविण्यपूर्ण अशा 'सिग्नल शाळे'ची उभारणी करण्याचाही पर्याय लोढा यांनी पालिकेला सुचवला होता. बेघर मुलांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षणाची सुविधा, बौद्धिक विकास आणि उज्वल भविष्यासाठीची संधी देणारी 'सिग्नल शाळा' उभारण्याच्या दृष्टीने पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इक्बालसिंह चहल आणि अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी प्रशासनाला सूचना दिल्या होत्या. जिल्हा नियोजन समिती (मुंबई उपनगर) च्या निधीतून सदर प्रकल्पासाठीची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.



दादर पश्चिम येथे दिनार तांबे यांच्या घरी दीड दिवसांच्या माघी गणेशाची स्थापना करण्यात आली आहे.

डेज संस्कृतीमुळे संस्कृती आणि मूल्यांशी दुरावा!

फेब्रुवारी महिना सुरू झाला की तरुणांना वेध लागतात ते वेगवेगळे डेज साजरा करण्याचे त्यासाठी ते जय्यत तयारीही करतात. रोज डे पासून सुरू झालेला हा डेज चा महोत्सव व्हॅलेंटाईन डे ला संपतो. या दरम्यान प्रपोज डे, प्रॉमिस डे, टेडी डे, चॉकलेट डे, हग डे, किस डे असे विविध प्रकारचे डे येतात. डेज चा हा महोत्सव आठवडाभर चालतो. तरुण वर्ग विशेषतः महाविद्यालयीन तरुण हे डेज साजरे करण्यात आघाडीवर असतात कारण याच वयात मनी प्रेम फुलत असते. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला गुलाबाचे फुल देऊन आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून गुलाबाकडे पाहिले जाते म्हणून या दिवसात गुलाबाला खूप मागणी असते. यावेळी तरुणांच्या उत्साहाला उधाण येत असते. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते. या डेज च्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल होत असते हे जरी खरे असले तरी आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त का लागतो ? आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी नजरेचा एक कटाक्ष आणि चेहऱ्यावरील हास्यही पुरेसे असते. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे चाच मुहूर्त असावा असे काही नाही. मुळात असे डेज साजरे करावेत की नाही यावर देखील मतमतांतरे आहेत. माझ्यामते कोणावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांना भेटवस्तू देण्यासाठी, त्यांना आनंदी करण्यासाठी, त्यांना आश्चर्यचकित करण्यासाठी, त्यांना आपल्या मनातील भावना सांगण्यासाठी कोणत्याही डे ची गरज नसते. बरे हे डे पुराण तरुणांसाठीच असतात असेही नाही. आजच्या सोशल मीडियाच्या युगात तर डेज चे पेवच फुटले आहे. व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे, फादर्स डे, मदर्स डे, सिस्टर्स डे, ब्रदर्स डे, डॉटर्स डे असे कितीतरी डे येतात. एका वर्षात किती डे येतात आणि जातात याची गणनाच नाही. अति झाले नि हसू आले अशी गत या डेज ची झाली आहे. सोशल मीडियावर ॲक्टीव असणाऱ्यांसाठी तर हे डेज म्हणजे पर्वणीच असते. वेगवेगळ्या डेजच्या शुभेच्छा देणाऱ्यांवर लाईक, कमेंट आणि शेअरचा पाऊस पडतो. वर्षभर कधी आई वडीलांप्रती आदर व्यक्त न करणारे मदर्स डे, फादर्स डे ला खूप ॲक्टीव असतात. जन्मदात्या आई वडिलांच्या आठवणींसाठी, त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यासाठी, त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी मदर्स डे, फादर्स डे ची वाट पाहण्याची वेळ तरुणांवर आली आहे. हे डेज म्हणजे नैतिकतेचे अवमूल्यन आहे. कोणतेही डे साजरे करण्यापूर्वी खरोखरच या डेज ची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येकाने विचारून पहावा. आधुनिकतेच्या नावाखाली पाश्चात्यांचे अंधानुकरण केल्यामुळे आपल्या मूळ संस्कृतीशी आणि मूल्यांशी दुरावा निर्माण होत आहे, हे मात्र नक्की!

श्याम ठाणेदार,
दौंड जि. पुणे

वाढत्या गुन्हेगारीच्या नियंत्रणासाठी चर्चा करा ; राजकारण नको!

राज्यात गुन्हेगारी दिवसेंदिवस वेगवेगळे रूप धारण करून वाढत आहे ही बाब सर्वसामान्यांच्या दृष्टीने व राज्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब आहे.याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.परंतु राज्यात पक्ष-विपक्ष गुन्हेगारीवर आळा घालण्याच्या चर्चेपेक्षा राजकारण कसे करता येईल व आपली राजकीय पोळी कशी शेकता येईल याकडे संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष लागल्याचे दिसून येते.यामुळे सर्वसामान्यांचा राजकीय पुढाऱ्यांवरून विश्वास कमी होऊ शकतो याला नाकारता येत नाही. नुकतेच कल्याण पूर्वचे भाजप आमदार गणपत गायकवाड आणि कल्याण पूर्वचे शिवसेना शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यामध्ये व्दारली येथील एका जमिनीच्या मुद्यावरून दिनांक २ फेब्रुवारी शुक्रवारला पोलिस ठाण्यातच झालेला वाद विकोपाला गेला.या वादात आमदार गणपत गायकवाड यांनी थेट हिललाइन पोलिस ठाण्यामधील वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या दालनात महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यावर अंदाधुंद गोळीबार करीत ठार मारण्याचा प्रयत्न केला.यावरून स्पष्ट होते की आमदार (लोकप्रतिनिधी) ची गुन्हेगारी करण्याची हिंमत वाढल्याचे दिसून येते.कारण पोलिस ठाण्यात बंदुकीने अंधाधुंद गोळीबार करणे म्हणजेच गुंडगिरीला प्रोत्साहन देणे होय,याला आमदार (लोकप्रतिनिधी) म्हणता येणार नाही.अशा अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या सरकारने आवरायला पाहिजे व पोलिस विभागाला अशांवर कारवाई करण्याची खुली सुट द्यायला हवी.ठाण्याची घटनेला काही दिवस होत नाही तर,त्याचीच पुनरावृत्ती आपल्याला मुंबईत दिसून आली.कारण ठाण्यातील पोलिस ठाण्यात भाजप आमदाराने केलेल्या गोळीबाराचा धक्का कायम असतांनाच बोरिवलीमधील एका स्थानिक कार्यकर्त्याने दिनांक ९ फेब्रुवारीला शिवसेना उध्दव ठाकरे पक्षाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या केली. साडीवाटपाच्या कार्यक्रमासाठी बोलावून मॉरिस नरव्होना या कार्यकर्त्याने घोसाळकर यांच्यासमवेत ''फेसबुक लाइव्ह''केला व नंतर अभिषेक यांच्यावर दोन-तीन गोळ्या झाडल्या यानंतर याने स्वतःवरही गोळ्या झाडून आत्महत्या केली. म्हणजेच गुन्हेगारी कोणत्याही प्रकारची असो ती गुन्हेगारीच म्हणावी लागेल.याकरीता राज्यातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी पक्ष-विपक्षांनी एकत्र येऊन या विषयावर सविस्तर चर्चा करने अत्यंत गरजेचे आहे कारण सुरक्षेच्या दृष्टीने हा अत्यंत गंभीर विषय आहे.त्याचप्रमाणे राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आणि सर्वसामान्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने पोलिस विभागाला आपण काय मदत करु शकतो अशा पध्दतीची सर्वोतोपरी मदत करण्याचा विचार करायला पाहिजे.कारण राज्यात किंवा देशात गुन्हेगारीची मुख्य जड ही राजकाणातुनच निर्माण होत असते.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी कोणत्याही गुन्हेगारीचे किंवा गुन्हेगारांचे राजकारण करून व त्यांना खतपाणी देणे सर्वप्रथम बंद केले पाहिजे व राज्याच्या किंवा देशाच्या सुरक्षा यंत्रणेला सर्वतोपरी मदत करायला हवी. राजकीय पुढारी जर सुरक्षा यंत्रणेला मदत करणार नाही तर पोलिस विभाग काय करेल याचाही विचार सरकार,पक्ष-विपक्षांनी केलाच पाहिजे. पोलिस विभाग गुन्हेगारांना मोठ्या कठीण प्रसंगातून आपल्या जीवाची पर्वा न करता पकडतात व त्यांच्या कायदेशीर कारवाई करतात.परंतु राजकीय पुढारी गुन्हेगारांना खतपाणी घालतात हे राज्यात सध्याच्या परिस्थितीत घडत असलेल्या घटनेवरून लक्षात येते.त्यामुळे गुन्हेगारांवर वचक बसण्याकरीता पोलिस विभागाला कडक कारवाई करण्याकरीता सरकारने खुली सुट द्यायला हवी तेव्हाच गुन्हेगारीवर आळा बसेल.=



/ लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार,
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

बिड शिवसेनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

दुष्काळी उपाय योजना लागू करण्या बाबद व बँक ठेवीदारांच्या ठेवींचा प्रश्न

जिल्हा प्रतिनिधी

बिड : दुष्काळी उपाय योजना लागू करण्या बाबद व बँक ठेवीदारांच्या ठेवी मिळण्यासाठी शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे यांच्या नेतृत्त्वाखाली व माजी आमदार तथा लोकसभा प्रमुख सुनील धांडे,बीड जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे,शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते ,जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, महिला आघाडीच्या जिल्हा संघटीका संगीताताई चव्हाण, युवासेना जिल्हा अधिकारी गजानन कदम, युवासेना जिल्हा अधिकारी रविराज बडे, शहर प्रमुख शेख निजाम यांच्या प्रमुख उपस्थितीत,दुष्काळी परिस्थितीचे निवारण करणे व बँक मधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला.यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, जिल्हा संघटक रतन गुजर, जिल्हा संघटक नितीन



धांडे, महिला आघाडीच्या जिल्हा सह संघटीका फरजना भाभी,तालुका प्रमुख गोरख आण्णा शींघण, वडवणी तालुका प्रमुख विनायक मुळे, अंबाजोगाई तालुका प्रमुख बाळासाहेब शेप,पाटोदा तालुका प्रमुख मुकूंद शिंदे, गेवराई तालुका प्रमुख अजय दाभाडे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, शिरूर प्रभारी तालुका प्रमुख सोपान मोरे, युवा सेना पाटोदा शहर अजिंक्य डोरले, आष्टी उपतालुकाप्रमुख दादा लगड, आष्टी उपतालुकाप्रमुख महेश एकशिंगे, आष्टी शहर प्रमुख शिवप्रसाद जाधव,प्रमुख शिरूर विद्यार्थी संघटनेचे तालुका प्रमुख राजेश कोकणे, विनोद गुंड पाटील, संजीव भारती,प्रशांत केदार,कलीम शेख, मारोती गिरी,, संजय येवले, विशाल शिंदे, अशोक माळवे,साजेद भाई, गणेश चव्हाण, संतोष पवणे, अक्षय वासकर, विष्णू शितोळे ,सुरज गवळी,माधव डोरले,सागर दिक्षित, रामदास मोहिते अशोक जोगदंड,बबन खंडागळे,रसाळ सोपान, बाबुराव सातपुते सह सर्व पदाधिकारी, ठेविदार व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वतःला असे घडवा की.....

/ गणेश खाडे : लेखक

साध्यच युग हे स्पर्धेचे आहे मान्य करून आपली गुणवत्ता श्रेष्ठ कशी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.कोणत्याही क्षेत्रातील मेहनत करताना स्वतःला असं घडवा कि संधीच्या रांगा आपल्या दरात लागल्या पाहिजेत.आपल्या जे मिळवायचे आहे त्या पदाच्या अनुषंगाने आपण घेतलेली मेहनत एवढी प्रचंड प्रमाणात असली पाहिजे कि त्या पदाला अपेक्षित गुणवत्ता किती आहे त्या पेक्षा अधिक सरस गुणवत्ता हि आपल्याकडं असली पाहिजे.पण असं होतं नाही.आपण शिक्षणला गांभिर्याने घेत नाही टंगळमंगळ करतो.योग्य वेळी दुस-याच उचापती करतो.आणि शेवटी बोलतो शिक्षणात दम नाही.शिक्षणात दम आहे आपला मार्ग चुकला आहे हे आपण मान्य करत नाही.

शिक्षणाच्या संदर्भात कधीचं नकारात्मक दृष्टिकोन नसला पाहिजे.आपण स्वतःला असं घडवलं पाहिजे कि अनेक संधी आपल्या दरात उभ्या राहिल्या पाहिजेत.आपण मुळात असं करत नाही.योग्य वेळी आपल् लक्ष आपल्या धेय्य वर नसतं आणि मग आपण त्याच खापर फोडुन मोकळं होतो हे संयुक्तिक नाही.आपेक्षित पदा पेक्षाही जास्त गुणवत्ता आपण अर्जित केली पाहिजे.जेव्हा आपल्याकडे अपेक्षित संधी पेक्षा जास्त गुणवत्ता असेल तेव्हा आपल्या वर अन्याय कसा होईल. पण आपण असं करत नाही त्यामुळे संधी पर्यंत आपण पोहचत नाही आणि फक्त व्यवस्थेला दोष देवून मोकळं होण्या अगोदर आपण स्वतःच मुल्यमापन केल पाहिजे. सध्या गरीब आणि श्रीमंत यांच्या मध्ये असणारी दरी दैनंदिन झपाट्याने वाढत चालली आहे.गरीब हा अधिकच गरीब होत चाललाय.आशा विदरक परस्थिती मध्ये गरीबाकडे आपली परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षणाशिवाय इतर दुसर कोणतही महत्वाचं साधन उपलब्ध नाही.साधारणता आपल्याकडे आपल्या आर्थिक स्थितीवरून आपला सामाजिक दर्जा,उंची,सन्मान ,लोक ठरवतात.आर्थिक दृष्ट्या अत्यंत सदन व्यक्तीचे सामाजिक मूल्यमापन वेगळे असते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.तर अत्यंत गरीब कष्टकरी याच्याकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन वेगळा असतो. यामध्ये महत्त्वपूर्ण बाब ही आहे कि साध्य स्थिती मध्ये शिक्षण हि अशी एकमेव बाब आहे की ज्याच्या माध्यमातून अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती देखील उच्चशिक्षित होऊन आपला सामाजिक दर्जा बदलू शकतो.म्हणून शिक्षण हे एकमेव असं माध्यम आहे कि ज्याच्या माध्यमातून अत्यंत गरिबातील गरीब व्यक्तीला सुद्धा आपला दर्जा महत्व उंची सामाजिक पातळीवर बदलता येऊ शकते . निर्माण करता येऊ शकते.ज्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे किंवा बेताची आहे त्यांनी शारिरीक कष्ट कितीही केले तरी फार फार त्यांच्या वाट्याला व्यवस्थित जीवन जगणं इथं येऊ शकत.महणजे काय तर व्यक्तीने कितीही प्रचंड रात्रंदिवस मेहनत केली तर ते फार पोटाला व्यवस्थित होऊ खाऊ शकतील.फार अंगभर कपडे घेऊ शकतील.आणि छप्पर मातीचे जे घर आहे त्या मध्ये थोडाफार बदल करु शकतील.परंतु सामाजिक पातळीवर योग्य अशी उंची किंवा दर्जा बदलायचा असेल तर ती अमूल्य शक्ती,ताकद,सामर्थ्य हे फक्त शिक्षणात आहे. सद्यस्थितीमध्ये समाजात पद, प्रतिष्ठान,संपत्ती, यावरून साधारणतः व्यक्तिचा सामाजिक दर्जा लोक निश्चित करतात.यातील बहुतांशी सर्व परंपरा,रूढी,किंवा वडिलोपार्जित वारसा हक्कानुसार अर्जित होतात.उद्योगपतीचा मुलगा उद्योगपती होतो.राजकारणी व्यक्तींची मुलं राजकारणी नेते होतात. जमीनदाराची मुलं जमीनदार होतात . सिनेकलावंत शेत्रातील बहुतांशी कलाकारांची मुलं त्याच दिशेने मार्गक्रमण करून यशस्वी होतात.अनेक व्यवसायिक यांची मुलं आपल्या वडिलांचा पारंपारिक व्यवसाय पुढे चालवतात.म्हणजे एकदा का कोट्याधीश म्हणून दर्जा मिळाला प्राप्त झाला की तो कित्येक पिढ्यांना वारसा हक्कानुसार मिळतो.परंतु महत्त्वाची बाब ही आहे की ज्यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र कष्ट कराव लागतं.अठरा विश्व दारिद्र्य त्यांच्या दारात सदैव उभा असते.अशा अत्यंत गरीब वंचित पीडित ज्यामध्ये सर्व सामान्य अत्यंत गरीब वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांना अत्यंत गरिबी परिस्थितीमध्ये जीवन जगाव लागत आहे.या लोकांना आपल्या जीवनामध्ये आपला सामाजिक दर्जा आपली सामाजिक ओळख बदलायची असेल आणि पिढ्यानपिढ्या आपल्यावर लागलेला गरिबीचा कलंक पुसून काढायचा असेल तर खूप कमी संधी उपलब्ध असतात.म्हणजे शिक्षणा शिवाय इतर कुठलाही मार्ग नाही.संधी उपलब्ध नसती.म्हणून एकमेव ब्रह्मास्त्र जे आपल आयुष्य आणि सामाजिक दर्जा बदलू शकतो.ते म्हणजे शिक्षण आणि म्हणूनच शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध असं म्हटलं आहे त्यात अत्यंत सुसंगत आणि एका योग्य आहे.म्हणून सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये शिक्षणाच अनन्य साधारण महत्व आहे.म्हणून खरी गरज आहे ती हे महत्त्व ओळखणयाची आणि महत्व ओळखून त्या अनुषंगाने प्रयत्न करण्याची शिक्षण हे आपली सामाजिक ओळख बदलून आपल्याला सामाजिक स्तरावर सन्मान मिळवून देऊ शकते तसेच आपला सामाजिक दर्जा आणि महत्व वाढवू शकते आपली समाजातील प्रतिष्ठा मान सन्मान हे आपल्याला जे पिढ्यानपिढ्या किंवा परंपरेनुसार किंवा सामाजिक रचनेनुसार मिळाले नाहीत ते फक्त आपल्याला शिक्षणाच्या माध्यमातून मिळू शकतात.म्हणून सामाजिक अडगळीला पडलेल्या समाज समूहाने किंवा ज्यांना कित्येक पिढ्या अहोरात्र कष्ट करून सुद्धा आपला सामाजिक दर्जा बदलण्याची संधी नाही. त्यांनी शिक्षणाची कास धरावी.आपल्या पाल्यांना शिक्षित उच्चशिक्षित करून आपला सामाजिक दर्जा बदलण्यासाठी मिळालेल्या संधीचं योग्य फायदा घेऊन इतरांसाठी प्रेरणादायी व्हावे.आणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक दर्जा बदलण्याची अभिनव संधी मिळाली आहे त्याचा यथा योग्य फायदा घेतला पाहिजे. आपल्या वर लागलेला मागासलेपणा हा शिक्का पुसण्यासाठी शिक्षणा शिवाय दुसरं कोणतंही प्रभावी माध्यम सध्या तरी उपलब्ध नाही. म्हणून उपलब्ध मध्यमाचा यथासांग उपयोग घेतला पाहिजे आणि आपल्यासह आपल्या कुटुबांच भविष्य बद्दल पाहिजे. आपली गुणवत्ता एवढी प्रभावशाली असली पाहिजे कि संधीच्या रांगा आपल्या दरात लागल्या पाहिजेत हे अशक्यप्राय गोष्ट नक्कीच नाही.

केळझरमध्ये होणार शेकडो दिंड्यासोबत हजारो भाविक दाखल

एकचक्रि नगरात आज दिडी सोहळा





दै.जनप्रभात

सेलू . प्रशांत झाडे

असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या केळझर येथील सिध्दीविनायक गणपती मंदिरात गणेश जयंती व महालक्ष्मी उत्सवानिमित्त बुधवार दि.१४ ला होत असलेल्या दिंडी सोहळाने एकचक्रीनगर दुमदुमणार आहे. पांडवकालीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सिध्दीविनायक गणपती देवास्थानाच्या वतीने दिंडी सोहळा व काला, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडी सोहळ्याला विदर्भातुन शेकडो भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. हा नेत्रदिपक सोहळा डोळ्यात साठविण्यासाठी विदर्भातुन हजारो भाविक येथे दाखल होणे सुरु झाले आहे. श्री गणेश जयंती व महालक्ष्मी निमित्त टाळ, मृदंगाच्या, निनाद, भगव्या पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन भजनी मंडळीच्या सहभागाने सिध्दीविनायक मंदिरातून १२ वाजता दिंडी सोहळ्याला प्रांरभ होणार आहे. या सोहळ्याकरीता येणाऱ्या भाविकांच्या स्वागातासाठी केळझरकरांनी स्वागत कमानी उभारल्या असुन रांगोळयानी संपूर्ण रस्ते शुभोभित केले जाणार आहेत. सोहळयात भजनी मंडळे व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिराचे अध्यक्ष माधव ईरुटकर व सचिव महादेव कापसे व कमेटिच्यावतीने करण्यात आले आहे. गणेश जयंती व महालक्ष्मी उत्सव दि. ६ फेब्रुवारी पासुन सुरु झाला असुन सप्ताहाची समाप्ती बुधवार दि. १४ फेब्रुवारी रोजी दहीहांडी, महाप्रसाद शेकडो दिंडी व हजारो भाविकांना या सोहळ्यात उपस्थित होणार आहे.घटस्थापना पुजारी राममुरत मिश्रा यांच्या करण्यात आली आहे. तर महाअभिषेक विजय मुररका नागपूर ,राजाबाबु मुरारका ,अध्यक्ष माधव ईरुटकर यांच्या हस्ते करण्यात आला आहे व दहीहांडी काल्याचे किर्तन ह भ प पांडुरंग सायंकर महाराज यांच्या हस्ते होणार आहे. तर भाविकांना महाप्रसादाचे वितरण विजय मुरारका परिवारा कडून करण्यात येणार आहे.

****

नरखेड येथील पशुवैद्यकीय दवाखाना झाली शोभेची वास्तू.

जिल्हा पशुधन वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिले नियुक्तीचे आदेश



दै.जनप्रभात / अतुल दंढारे
तालुका प्रतिनिधी नरखेड.

नरखेड शहर लोकसंख्येच्या मानाने नरखेड मध्ये शेतकऱ्यांची संख्या अधिक प्रमाणात आहे. त्यासोबतच पशुधनाची संख्या सुद्धा बरीच आहे. परंतु या जनावरांच्या आरोग्याची समस्या निर्माण झाल्यास त्यांना नरखेड येथील पंचायत समिती अंतर्गत पशुधन अधिकारी तथा पशुवैद्यकीय विभाग नरखेड येथे उपचार करता आणावे लागते. परंतु या दवाखाना मध्ये एकही डॉक्टर नसून इथे असलेले शिपाई नरेश घुमडे चक्क गेल्या वर्षीपासून पासून जनावरांची उपचार पट्टी करत आहे. नरखेड पशुधन विकास अधिकारी यांची बदली झाली असून एक जून २०२३ पासून ही जागा रिक्त आहे. याशिवाय पट्टीबंधक,पर्यवेक्षक, शिपाई कार्यारत असून एका शिपायाचे पद सुद्धा रिक्त आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये रोज १५ ते २० जनावर येतात. यांच्या उपचाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याशिवाय लिपी आजारामुळे जनावरे उपचारासाठी वाढलेली असून डॉक्टरच नाही यामुळे येथील शेतकरी प्रशासनावर नाराज झालेले आहे. रोज उपचारासाठी येणाऱ्या जनावराची जख्म स्वच्छ करणे, ड्रेसिंग करणे, खच्चीकरण करणे, सर्वसाधारण उपचार करणे कृत्रिम रेतन करणे. इत्यादी कामे करावी लागते. डॉक्टर नसल्यामुळे कृत्रिम रेतनासाठी जनावरांसह शेतकऱ्यांना डॉक्टरांची वाट पाहावी लागते. परंतु डॉक्टर आहेच नाही हि बाब गंभीर आहे. नरखेड पंचायत समिती अंतर्गत डॉ.गोरे पशुधन विस्तार अधिकारी पंचायत समिती नरखेड यांच्याशी या संदर्भात चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, नरखेडला डॉक्टर नसून अतिरिक्त पदभार आहे. डॉ. भावना धोत्रे यांच्याकडे अतिरिक्त प्रभार असून त्यांना नरखेड, जलालखेडा,भरसिंगी,थंडीपवनी, लोहारी सावंगा पर्यंत जनावरांच्या उपचारासाठी जावे लागते. त्यामुळे नरखेडला इमर्जन्सी असेल किंवा वेळ उपलब्ध असेल तेव्हाच नरखेडला असते. डॉ.पोटरे पर्यवेक्षक यांच्याकडे सुद्धा अतिरिक्त प्रभार असून त्यांची नियुक्ती सावरगाव येथे आहे.डॉक्टर उपलब्ध राहत नसल्यामुळे शेतकरी खाजगी डॉक्टरांच्या माध्यमातून जाणवरांचा उपचार करीत.

==========

प्रतिक्रिया

तालुक्याचे ठिकाण असून सुद्धा डॉक्टरांची कमतरता आहे. जनावरांचे उपचार करण्याची वेळ शिपायांवर यावी यासारखे दुर्दैव आमच्या शेतकऱ्यांचेच आहे. औषध उपलब्ध सुद्धा नाही. लवकरात लवकर डॉक्टरांची व्यवस्था कराअन्यथा पशुवैद्यकीय दवाखान्याला कुलूप लावा अशी संतप्त भूमिका नरखेड येथील शेतकरी घेतील. रमेश रेवतकर शेतकरी नरखेड

==========

पशुवैद्यकीय दवाखान्यात खूप गर्दी असते एक एक दोन दोन तास थांबावे लागते मात्र डॉक्टर उपलब्ध होत नाही. जनावरांचा त्रास पाहून स्वतः शिपाईच नाईलाजाने जनावरांचा उपचार करतात. जर शिपाई डॉक्टर झाले तर डॉक्टरांची गरजच काय असा आमचा शासनाला संतप्त प्रश्न आहे..

राजेंद्र ठाकरे शेतकरी.
नरखेड

==========

पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर नसणे हि गंभीर असून विभागाने तत्काळ डॉक्टरची नियुक्ती करण्यात आली पाहिजे.कोणतेही वरिष्ठ अधिकारी लक्ष देत नाही.लोकप्रतिनिधीची जबाबदारी असून शासनाने तत्काळ डॉक्टरची व्यवस्था करावी. महेंद्र गजबे सभापती प.स.नरखेड

नरखेड़ येथे शेतकरी जोड़ धंदा म्हणून प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय करतात मी स्वतः ३ वर्ष अगोदर २५ गायी पासून सुरु केला पण पशुवैद्यकीय सहायता न मिळाल्याने १ वर्षा पूर्वी बंद केला. आजही येथे तीच अवस्था आहे जर ही अशीच राहली तर नरखेड़ दुग्ध व्यवसाय व शेतकरी जोड़ धंदा हा लवकरच संपुष्टत येईल याला सर्वस्वी जबाबदार शासन आहे.

सौ.हर्षा कळंबे दुग्ध व्यवसायिक नरखेड

==========

विशेष चर्चा

पशुवैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर नाही या संदर्भात सलीलभाऊ देशमुख यांनी पाठपुरावा करून लवकरच डॉक्टरची नियुक्ती करण्यात येईल असे सांगितले. यावेळी जिल्हा पशुधन अधिकारी यांनी आमचे प्रतिनिधी सुनील मोहोड यांचे सोबत व्हिडिओ कॉल द्वारे या संदर्भात सविस्तर चर्चा करून १० दिवसात डॉक्टर नियुक्त करण्याचे आदेश देत आहे. असे सांगितले.

बांबू लागवडीला प्रोत्साहन देणार – मंत्री सुधीर मुनगंटीवार

बांबूनिर्मित वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील



दै.जनप्रभात मुंबई, दि. १३ : राज्यातील बांबू लागवडीला चालना देण्यासाठी राज्य शासनाने विविध पावले उचलली आहेत. बांबू लागवडीसाठी अनुदान देण्यापासून ते बांबूपासून निर्मित विविध वस्तूंना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न होत आहेत. हे प्रयत्न अधिक गतीने करावे. बांबूपासून बनणाऱ्या वस्तू तयार करण्यासाठी कौशल्य विकासाची याला जोड द्यावी, असे निर्देश वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. मंत्रालयात आज महाराष्ट्र बांबू विकास नियामक मंडळाची बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. केंद्राच्या बांबू प्रचार आणि लागवड समितीचे सदस्य आणि राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाळ रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान उपमुख्य वन संरक्षक (बांबू) श्रीनिवास राव यांच्यासह नियामक मंडळातील सदस्य व अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सुरुवातीला राज्य बांबू विकासासंदर्भातील अटल बांबू योजना, राष्ट्रीय बांबू योजना, स्फूर्ती योजनांची अंमलबजावणी आढावा सादरीकरणाद्वारे घेतला. जे शेतकरी बांबू लागवड करु इच्छितात, त्यांना प्रोत्साहन देणे, बांबू उत्पादनांना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ठिकठिकाणी प्रदर्शन दालने तयार करावीत. कौशल्य विकासासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची मदत घ्यावी, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि इतर योजनांची सांगड घालून एकात्मिक पद्धतीने शेतकऱ्यांसाठी ती राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बांबू रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध होण्यासाठी बांबू ऊतीसंवर्धन रोपवाटिका तयार करावी. बांबू पॅलेट आणि बांबू चारकोल साठी आयआयटी, मुंबईच्या सहकार्याने प्रकल्प अहवाल तयार करुन त्याची अंमलबजावणी करावी, याबाबतही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी निर्देश दिले. बांबू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेताना बॅंकांकडून अडवणूक होऊ नये याकडे लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्यात अनेक शेतकऱ्यांनी बांबू लागवड मोठ्या प्रमाणात करुन बांबू हे उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असल्याचे दाखवून दिले आहे. या शेतकऱ्यांच्या प्रकल्पांना इतर शेतकऱ्यांच्या भेटी आयोजित करणे, त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.

नागपुरात १६ फेब्रुवारीपासून महालक्ष्मी सरस प्रदर्शन

विदर्भासह राज्यातील वैविध्यपूर्ण उत्पादनांचे स्टॉल्स

दै.जनप्रभात

नागपूर दिलीप येवले-: मुंबई येथील महालक्ष्मी सरसला मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे यंदा अतिरिक्त महालक्ष्मी सरस नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. दिनांक १६ ते २६ फेब्रुवारीपर्यंत रेशीमबाग मैदानावर हे प्रदर्शन आयोजित केले जात असून यात ग्राहकांना राज्यातील अनेक वैविध्यपूर्ण उत्पादने मिळतील. विविध बचत गटांना यातून आर्थिक लाभ मिळावा यादृष्टीने प्रयत्न केले जात असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी केले.ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समुहांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, चालना मिळावी यासाठी केंद्र व राज्य शासन सतत प्रयत्नशील आहे. या उद्देशाने राज्य पातळीवरील मुंबई येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे ग्राम विकास विभागांतर्गत आयोजन केले जात आहे. या प्रदर्शनापासून अनेक महिला बचत गटांनी प्रेरणा घेतली आहे. नागपूरच्या महालक्ष्मी सरसमध्ये राज्य पातळीवरील निवडक सुमारे ३०० स्टॉल असतील. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याला संधी दिली असून



यात नागपूर जिल्ह्याचे ११ स्टॉल्स असणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील भिवापुरी मिरचीने महाराष्ट्राचे लक्ष वेधले असून याचाही स्टॉल राहणार आहे. याचबरोबर गडचिरोलीच्या वन, बांबू उत्पादनांसह कोल्हापुरी चप्पल, पैठणी, कोकणची खेळणी आदी वस्तू ग्राहकांना उपलब्ध होतील. दिवसाला २५ हजार नागरिक प्रदर्शनाला भेट देतील असा अंदाज घेऊन नियोजन केले जात असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनी सांगितले. महालक्ष्मी सरस प्रदर्शनीचा मुख्य उद्देश देशातील व राज्यातील स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांनी व ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देणे तसेच समुहांतील सदस्यांना विविध राज्यातील उत्पादने, विक्री व बाजारपेठेची माहिती देणे व राज्या- राज्यातील लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती व कलाकुसर इत्यादीचा परस्परांना परिचय करून देणे, शहरी भागातील लोकांना अस्सल ग्रामीण भागातील वस्तू, पदार्थ उपलब्ध करुन देणे हा असल्याचे श्रीमती शर्मा यांनी सांगितले. राज्यभरातील विविध भागांतील वैविध्यपूर्ण चवींचे खाद्यपदार्थ या प्रदर्शनात उपलब्ध होत असल्याने नागपूरकरांना या प्रदर्शनाच्या निमित्ताने मेजवानीच मिळणार आहे. राज्यस्तरावरील या प्रदर्शनात नेहमी सहभागी होत असलेले सर्व प्रकारचे स्टॉल्स या प्रदर्शनात असणार आहेत अभियानाला प्रचार व प्रसिद्धी तसेच महिलांच्या उत्पादनांना राज्यातील इतर मोठ्या शहरात मागणी व प्रसिद्धी मिळेल. नागपूर येथील सरसच्या आयोजनामुळे विदर्भातील स्वयंसहाय्यता गटांना बाजापेठ उपलब्ध होण्यासाठी व त्यांच्या उत्पादकतेला तसेच व्यावसायिकतेला चालना मिळण्यासाठी यातून मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूरकरांनी आणि परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन श्रीमती शर्मा यांनी केले आहे. पत्रकार परिषदेला प्रकल्प संचालक वर्षा गौरकर, जिल्हा अभियान व्यवस्थापक शेखर गजभिये, जिल्हा व्यवस्थापक विपणन अमोल बाविस्कर उपस्थित होते.







कडाची वाडी (चाकण)येथे श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचे पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन

शिरूर प्रतिनिधी शकील मनियार

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्र चार्यजी महाराज यांचा पूर्वनियोजित महासंतसंग व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम रविवार दिनांक १८/ २ /२०२४ रोजी सकाळी ९:०० वा. कडाचीवाडी विठ्ठल रुक्मिणी मंदिरा जवळ चाकण ता.खेड जि. पुणे येथे आयोजित केलेला आहे.

तरी सदर कार्यक्रमाला संपूर्ण पुणे जिल्ह्यातून हजारो भाविक भक्तांची गर्दी होणार आहे रविवारी दे.१८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९:०० वा. जगद्गुरु श्रींच्या सिद्ध पादुकांची भव्य मिरवणूक, संत पेठावर आगमन, गुरुपूजन, आरती, प्रवचन, उपासक दीक्षा, दर्शन व पुष्पवृष्टी असा एक दिवसाचा जगद्गुरु श्रींचा पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम होत आहे. दरम्यान भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे भाविकांनी जगद्गुरुश्रींच्या अमृतवाणीचा, पादुका दर्शनाचा व महाप्रसादाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन स्व - स्वरूप संप्रदाय पुणे जिल्हा भक्त सेवा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. जगद्गुरुनरेंद्राचार्यजी महाराज संस्था लोकउपयोगी उपक्रम १) शैक्षणिक उपक्रम:- गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण शैक्षणिक साहित्य २) वैद्यकीय उपक्रम:- संस्थांच्या वतीने ५२ अॅम्बुलन्स सेवा महाराष्ट्रभर मोफत सेवा आणि नाणिज धाम येथे २४ तास हॉस्पिटल सेवा सुरू आहे. ३) कृषी विषयक उपक्रम :- गोरगरीब शेतकऱ्यांना मोफत बियाणे खते औषधे शेती अवजारे वाटप केली जातात. ४) आपत्कालीन मदत उपक्रम :- दुष्काळ पडल्यास संस्थांच्या वतीने जनावरांना शेकडो टन चारा पुरवला जातो. ५) अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रम:- अंगारे दोरे धुपारे गंडा यावर विश्वास न ठेवता अध्यात्म विज्ञान यांची सांगड घालून जीवन कसे जगावे हे मार्गदर्शन केले जाते ६) दुर्बल घटक मदत उपक्रम :- निराधार महिलांना घरघंटी शिलाई मशीन शेळ्या मेंढ्या धुपत्या गाई म्हशीचे वाटप केले जाते.

अशा प्रकारे अनेक उपक्रम संस्थांच्या वतीने राबवले जातात

लातूर मध्ये नाट्य संम्मेलनाचा बट्ट्याबोळ... संम्मेलनाचे स्टेज पडून एक जन गंभीर जखमी

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

लातूर:- महासंस्कृती महोत्सव आणि १०० व्या मराठी नाट्य परिषदेच्या मंचावर लोखंडी 'लाईट बार' कोसळला असून एक जण जखमी झाल्याची धक्कादायक घटना दयानंद सभाग्रहात घडली.. रात्री ९:३०च्या सुमारास.अभिनेते भरत जाधव यांच्या नाटकापूर्वी हि दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे या नाट्यसंम्मेलनास सकाळ पासूनचं नाट लागली असून बालनाट्य ११ वाजता सुरु होण्या ऐवजी... ते १वाजता सुरु झाले..या कार्यक्रमास पत्रकारही नाराज असल्याचे दिसले; जिल्हाधिकारी यांनी पत्रकारांना कुटुंबासोबत यावे सांगीतले असताना सुध्दा जिल्हा माहिती अधिकार्यांनी पास दिले नाहित ;त्यामुळे फ़ोटो काढण्यासाठी आणि वार्तांकन करण्यासाठी पत्रकार आणि फोटोग्राफर नव्हता...हे विशेष...महासंकृती महोत्सव आणि विभागीय १०० वे नाट्यसंमेलन दोन्ही एकत्र करूनही वेळेचे आणि सुसूत्रतेचे नियोजन करता आले नाही... नाट्य संमेलनाचे पदाधिकारी नटापटा करून मिरवण्यात आणि चमकोगिरी करण्यात मशगुल... असल्याचे चित्र दिसले तर प्रशसनाने दोन्ही कार्यक्रमाची सांगड घालून कार्यक्रमाचा बॅट्याबोळ केला... यामुळे लातूर शहरातच नव्हे तर जिल्ह्यात बदनामीचा सुर उमटला.



लातूर येथे होत असलेल्या महसंस्कृती महोत्सव कार्यक्रमासोबत १०० वे नाट्य संमेलन जोडून लग्नात मुंज साजरी करून शासन स्तरावर खर्च मात्र लग्नाचा दाखविण्याचा प्रताप लातूरच्या जिल्हाधिकारी करीत असल्याचा आता या घटनेवरून सिध्द झाले आहे.जिल्ह्यात या कार्यक्रमासाठी करोड़ों रुपयांचानिधीही गोळा करुन स्पॉन्सर ही घेण्यात आल्याची उघड चर्चा होवू लागली आहे.या कार्यक्रमात बोलवण्यात आलेल्या कलाकारांची तर अतिशय दैनिय अवस्था होती. या मध्ये पारंपरिक लोक प्रकारात मोडणार्या कलाकार महिलांच्या साड्या सुध्दा फाटलेल्या अवस्थेत दिसून आल्या.नेमका गोळा केलेला पैसा आणि शासनाचा पैसा गेला कोठे? हा संशोधनाचा भाग आहे.नाट्यसंमेलनाच्या पूर्वरंगपासून आयोजकांच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. ढिसाळ नियोजनाचा अनुभव मुख्य कार्यक्रमातही आला. त्यामुळे उर्वरित तीन दिवसांत नियोजनात काही सुधारणा होणार का, हे पाहावे लागणार आहे.

गायक राहूल सुर्यवंशी यांना Best Atist Awad हा सर्वोत्कृष्ट कलावंत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

दै,जनप्रभात उपसंपादक / राठोड रमेश पंडित

छ, संभाजी नगर:- छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ नाट्यमंदिरत मराठवाडा कला विकास महामंडळाच्या वतीने ३५ व्या विभागीय ललित कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभ मराठवाड्याचे शिक्षक आ.विक्रमजी काळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रसिद्ध सिने अभिनेत्री हेमांगी कवी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. शास्त्रीय संगीत,नृत्य,नाट्य,गायन,चित्र,शिल्प अशा विविध कला प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. त्यातील वैयक्तिक गायन या कलाप्रकारामध्ये लातूर जिल्ह्याचे सुपत्र तथा अहमदपूर येथील गायक मा.राहूल सुर्यवंशी यांना शिक्षक आमदार विक्रमजी काळे यांच्या हस्ते (इर्शीं अर्ऑळीं अुरअॅव २०२४) हा प्रथम पुरस्कार,मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले असून राहूल यांना सलग आठव्यांदा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी मराठवाड्यातील कलाकारांना एक महत्वाचे व्यासपीठ मिळवून देण्याचे काम



या ललित कला महोत्सवाच्या माध्यमातून श्री.प्रल्हाद शिंदे सर संगीताताई शिंदे व त्यांचे सर्व सहकारी करत आहेत. ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने या संस्थेची १ जुलै १९८९ रोजी स्थापना करण्यात आली होती. या महोत्सवाच्या माध्यमातून दरवर्षी ४ ते ५ लाख स्पर्धक सहभागी होतात. ही संस्था सांस्कृतिक क्षेत्रात देशात दुसऱ्या क्रमांकाची आणि महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाची संस्था आहे. या दरम्यान राहूल म्हणाले, क्षेत्र कुठलही असो स्वतः ला सिद्ध केल्याशिवाय प्रसिद्ध होता येत नाही. पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांना त्यांचं करियर स्वतः निवडू द्यावे. शिक्षणा समवेत आपल्या पाल्यांना त्यांच्या आवडी निवडींना प्रोत्साहन द्यावे.कारण पूर्वी सारखा काळ राहिलेला नाहीये. आज अनेकानेक संधी,विविध क्षेत्र या पिढीला लाभलेले आहेत. मी यशस्वी होईल की नाही ! हा न्यूनगंड कधीच डोक्यात जाता कामा नये. आपलं स्वतःच अस्तित्व निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कायम प्रयत्नशील आणि आशावादी जरूर राहील पाहिजे. असे प्रतिपादन राहूलनी व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुण्या – सिने अभिनेत्री हेमांगी कवी, सत्कारमूर्ती आ.विक्रमजी काळे, शिक्षक उपसंचालक संभाजीनगर – अनिल साबळे, मराठवाडा कला विकास महामंडळाचे अध्यक्ष – अशोक तांबटकर, सचिव – प्रल्हाद शिंदे, राहूल यांचे वडील प्रा.राजू सुर्यवंशी, राजेश निंबेकर इत्यादी मान्यवरांनी राहूल सुर्यवंशी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

अजित यशवंतराव यांची सिंधुरत्न समृद्ध योजना च्या समितीवर विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती

दै,जनप्रभात
राजापूर ता.प्रतिनिधी / पोवार प्रशांत सुरेश

==========

सिंधुरत्न समृद्ध योजना राबविण्यासंदर्भातील संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद (५.२) मधील तरतूदीनुसार सिंधुरत्न कार्यकारी समिती वर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाचे राजापूर लांजा मतदार संघातील धडाडीचे युवा नेते अजित यशवंतराव, मु.पो. गोविळ, ता. लांजा, जि. रत्नागिरी यांची निवड करणेत आली. गेल्या काही वर्षांपासून राजापूर लांजा विधानसभा मतदारसंघात अजित यशवंतराव सामाजिक राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ते सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा नेहमीच प्रामाणिकपणे प्रयत्न करतात. याचीच दखल घेऊन शासनाने अजित यशवंतराव यांच्यावर सिंधु रत्न समृद्ध योजनेच्या विशेष निमंत्रित सदस्य पदी नियुक्ती केली आहे. अजित यशवंतराव यांच्या निवडीबद्दल अजित यशवंतराव यांचे चिपळूण चे आम. शेखर निकम, माजी जिप सदस्य बापू शेट्ये. यांचेसह अनेकांनी अभिनंदन केले.



व्हेल मासा उलटी प्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही फरारच , मुद्देमाल हस्तगत करण्यात वनविभागाचे अपयश

दै,जनप्रभात
राजापूर ता.प्रतिनिधी / पोवार प्रशांत सुरेश

==========

राजापूर:- तालुक्यातील व्हेल माशाच्या तस्करी प्रकरणी संशयीत मुख्य आरोपी अद्यापही फरारच असुन मुद्देमाल देखील मिळविण्यात वनविभागाच्या अधिकाऱ्यान्ना अपयश आल्याने आता वनविभागाच्या कारभारावरच टिका होवू लागली आहे .

मागील आठवड्यात (४ फेब्रूवारी) रोजी विभागिय वनाधिकारी रत्नागिरी (चिपळुण) यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्र वनाधिकारी रत्नागिरी यांच्या मदतीने राजापूर वनविभागाने मिळालेल्या माहितीच्या आधारे व्हेल माशाच्या उलटीची तस्करी रोखण्यासाठी सापळा रचला होता . त्या प्रकरणी चार आरोपीना ताब्यातही घेतले होते .मात्र त्या प्रकरणातील मुख्य संशयीत आरोपी मात्र अद्याप सापडलेला नसुन तो फरारच आहे. तर तस्करीतील मुद्देमालही हस्तगत करण्यात वनविभागाच्या अधिकाऱ्यान्ना अद्याप यश आलेले नाही ही बाब सुध्दा अधोरेखित ठरली आहे .

तस्करीतील चार आरोपीन्ना अटक होत असताना दुसरीकडे मुद्देमाल न सापडणे यावरुन वनविभागाच्या भुमिकेवर साशंकता



व्यक केली जावू लागली आहे मुख्य संशयीत आरोपी आद्याप फरार कसा ?असे खोचक सवाल उपस्थीत होत आहेत .

ज्यावेळी ही तस्करी वनविभागाने रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा यातील आरोपीनी वनविभागाच्या अधिकार्यांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न करत पळुन जाण्यात यश मिळवले होते . त्यानंतर काही आरोपीना गगनबावडा येथुन ताब्यात घेतले असल्याचे वनविभागाने स्पष्ट केले होते. संशयीत मुख्यआरोपीसह मुद्देमाल देखील अद्याप सापडलेला नाही त्यामुळे मुद्देमाल सुध्दा फरार असल्याची टिका होत आहे वनविभागावरच आता संशयाच्या सुया फिरु लागल्या आहेत . *जो पाचवा आरोपी फरार असल्याचे वनविभाग सांगत आहे तो स्थानिक असल्याचे वनविभागाने यापुर्वीही स्पष्ट केलेले आहे . तो आरोपी कोण याची वनविभागाच्या अधिकार्यांना पुर्ण कल्पना असुन एका लोकप्रतिनिधीच्या हस्तक्षेपामुळे अद्यापही वनविभाग त्या आरोपीपर्यंत पोहचत नसल्याची चर्चा वनविभागाच्या भिंतीआड सुरु असल्याचे दिसुन येते . राजकिय दबावामुळेच या मुख्य आरोपीला मुंबइत जाण्यास अप्रत्यक्षरित्या पाठबळ दिल्याची चर्चाही खुलेआम पणे सुरु आहे.

आजपासून महाबळेश्वर येथे शैक्षणिक महोत्सवाचे आयोजन

दै.जनप्रभात

सातारा/जीवन मोहिते :शाळांचा शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता वाढवून तालुक्यातील सर्वच व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये शैक्षणिक आदान-प्रदान उत्तमप्रकारे व्हावे. तसेच नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे करुन शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा. यासाठी दि. १४ ते १६ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत तीन दिवसीय शिक्षण महोत्सवाचे आयोजन पंचायत समितीच्या प्रांगणात करण्यात येत असल्याची माहिती गटशिक्षण अधिकारी आनंद पळसे यांनी दिली आहे. दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी ग्रंथदिंडी व भारतीय संस्कृती परंपरा दर्शन पदयात्रा यांचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर महोत्सवात प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विविध विषयांचे ४० स्टॉल्स मांडण्यात येणार आहे. त्यामधून विविध शैक्षणिक संकल्पनांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. द्वितीय सत्रात शिक्षक कवी संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे.तद्नंतर गीत गायन कार्यक्रमाचे आयोजनही करपण्यात येणार आहे. दि. १५ फेब्रुवारी २०२४ रोजी बालसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार असून द्वितीय सत्रात प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सायंकाळच्या सत्रात शिक्षक व पंचायत समिती कर्मचारी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहे. दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळ सत्रात मान्यवरांचे शैक्षणिक व्याख्यान, परिसंवाद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात येणार आहे. द्वितीय सत्रात समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करुन महोत्सवाची सांगता होणार आहे. सदर महोत्सव प्रसंगी तालुक्यातील लोकप्रतिनिधींसह जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.तेव्हा पालक, ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी नागरिक यांनी सदर महोत्सवाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संयोजकातर्फे पंचायत समिती सह गटविकासाधिकारी सुनील पार्टे केले आहे.

पुर्णा शहरातील पाणीपुरवठा सुरळीत सुरू करा अन्यथा टँकरने शहराला पाणीपुरवठा करावा मनसेची मुख्याधिकारी यांच्याकडे मागणी

दै, जनप्रभात अरविंद कांबळे परभणी.

पूर्णा , आज दिनांक १३ फेब्रुवारी रोजी मनसे शहराध्यक्ष गोविंद उर्फ राज ठाकर व शेख गौस भारत बोबडे ,पंकज राठोड, यांच्यासह मनसे शिष्टमंडळ मुख्याधिकारी युवराज पौळ यांची भेट घेऊन पुर्णा शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करावा.या मागणीचे निवेदन दिले नगरपालिका प्रशासनातर्फे शहराला पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. दोन दिवसांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करून असे आश्वासन मुख्याधिकारी युवराज पौळ यांनी मनसे शिष्टमंडळ यांना दिले आहेत. पुर्णा शहरात गेल्या दहा-बारा दिवसापासून पाणीपुरवठा खंडित झाला आहे याविषयी नगरपालिका जाणून, बुजून,दुर्लक्ष करीत आहे मागील महिन्यात पूर्णा नदी पात्रातील कोल्हापुरी बांधाऱ्याचे



लाखो रुपये खर्च करून काम केले आहे व निसर्गाच्या कृपेने नदीपात्रात पाणी जमा झाले परंतु प्रशासनाच्याच्या निष्काळजीपणामुळे जमा झालेले पाणी वाहून गेले एका महिन्याच्या पुर्णा शहराला पाणी टंचाई सारख्या गंभीर प्रश्नाला सामोरे जावे लागलेदोन दिवसावर शिव जयंती आली आहे या सणासुदीच्या काळात पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी नगर पालिका प्रशासन कुठल्याही उपाय योजना करित नाहीत त्यामुळे नागरीकांना व अबाल वृद्धांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे किँवा हजारो रुपये खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत आहे उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाई सारख्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे अजून पूर्ण उन्हाळा किती पाणीटंचाई होईल अशी चिंता नागरिकांना निर्माण झाली आहे तरी मुख्याधिकारी यांना लवकरात लवकर पुर्णा शहरातील पाणी टंचाई सारख्या गंभीर प्रश्नावर उपाय योजना करुन पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची दखल घ्यावी.

पत्रकारांनी विकास कामात सहकार्य करावे : अरुण मरगळ

दै.जनप्रभात
सातारा/जीवन मोहिते:

शासनाच्या विविध योजनांची माहिती लाभधारकापर्यंत पोहचविणे. प्रचार-प्रसाराबरोबरच पत्रकारांनी विकास कामात सहकार्य करावे. असे प्रतिपादन पंचायत समितीचे गटविकासाधिकारी अरुण मरगळ यांनी केले. पंचायत समिती, महाबळेश्वरच्यावतीने पत्रकारांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तेव्हा मरगळ मार्गदर्शन करीत होते.ते पुढे म्हणाले,''पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून पंचायत समितीच्या आजवरच्या विकासाभिमुख योजनांच्या प्रसिद्धी संदर्भात पत्रकारांनी नेहमीच आपला सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पंचायत समितीला सहकार्य केले आहे. त्यामुळे पत्रकारांचा सन्मान करणे हे आमचं कर्तव्य समजतो. सुरुवातीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या



प्रतिमेचे पूजन मान्यवर व ज्येष्ट पत्रकारांच्या हस्ते करण्यात आले. गटविकासाधिकारी अरुण मरभळ यांनी सर्व पत्रकारांचा भेटवस्तु देऊन यथोचित असा सत्कार केला. सदरच्या कार्यक्रमास महाबळेश्वर पत्रकार संघाचे अध्यक्ष अजित जाधव,सर्व शहर व तालुक्यातील पत्रकार, दै. सकाळचे सुनील कांबळे (पाचगणी), अनिल वीर (सातारा), सहायक गट विकासाधिकारी सुनील पारठे,गट शिक्षणाधिकारी आनंद पळसे, उपअभियंता कांतीलाल उबाळे, तालुका आरोग्याधिकारी डॉ. प्रद्युमन बुलाख, बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती भणगे आदी सर्व विभागीय अधिकारी, पदाधिकारी, पत्रकारप्रेमी व नागरीक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.शिक्षणाधिकारी आनंद पळसे यांनी सूत्रसंचालन केले.दै.ऐक्याचे ज्येष्ठ पत्रकार संजय दस्तुरे यांनी आभार मानले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून सामाजिक उत्तराई होण्याची प्रेरणा मिळते - प्रा. डॉ.विशाल पतंगे

दै, जनप्रभात अरविंद कांबळे परभणी.

पूर्णा (जं.) प्रतिनिधी - राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने सामाजिक उत्तराई होण्याची प्रेरणा मिळत असते असे प्रतिपादन प्रा.डॉ.विशाल पतंगे यांनी केले. ते येथील स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक शिबिराच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे उदघाटन पांगरा या गावचे सरपंच उत्तमरावजी ढोणे यांनी केले तर शिबिराचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.प्रभाकर सूर्यवंशी यांनी मांडले.



पुढे बोलताना प्रा. डॉ. पतंगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी चार भिंतीच्या बाहेरच जग अनुभवलं पाहिजे, अभ्यासले पाहिजे. समाजातील या अनुभवाचे ज्ञानच विद्यार्थ्यांना जीवन जगण्यासाठी खऱ्या प्रेरणा देत असतात. त्यामुळे आजचे विद्यार्थी उद्याच्या समाजाचे खरे शिलेदार बनू शकतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून श्रमाचा आणि साहसी जीवनाबद्दलचा दृष्टिकोन मिळतो, हाच दृष्टिकोन आपल्यावर सामाजिक संस्कार करत असतो म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे खऱ्या अर्थाने सार्थक होते. असेही त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी विद्यार्थ्यांना जीवनात पुढे जायचे असेल कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नसल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी परिश्रमाची सवय लावून घेतली पाहिजे. मनातील न्युनगंड माणसाला पराभूत करतो म्हणून वाचनातून व श्रमातून चांगले वाईट याची निवड करण्याची सवय लागली की आपोआप आत्मविश्वास वाढतो व न्यूनगंड गळून पडतो. हे सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून साध्य करता येते असे त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले. या कार्यक्रमासाठी गावातील माजी सरपंच तथा तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नामदेवराव ढोणे, शालेय समितीचे अध्यक्ष रमेश ढोणे, विठ्ठलराव ढोणे, सखारामजी ढोणे, निवृत्ती ढोणे, अर्जुन ढोणे, शिवाजी ढोणे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिपमाला पाटोदे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. किर्तनकार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले.



प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना ईकेवायसी करुन घेण्याचे आवाहन

२१ फेब्रुवारी पर्यंत विशेष मोहिम

दै.जनप्रभात

वर्धा,दि.१३(जिमाका) : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांनी केवायसी प्रक्रिया पुर्ण केली नाही अशा लाभार्थ्यांसाठी दि.२१ फेब्रुवारी पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमे दरम्यान लाभार्थ्यांनी ईकेवायसी करुन घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळवून देणा-या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची सपृक्तता साध्यतेसाठी जिल्ह्यात दि.६ डिसेंबर २०२३ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत विशेष मोहिम राबविण्यात आली होती. मोहिमे दरम्यान ७ हजार ३३० शेतक-यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण तसेच ४ हजार ४०० शेतक-यांचे बँक खाती आधार संलग्न करण्याबाबतची प्रलंबितता कमी करण्यात आली. तथापि जिल्ह्यातील एकुण ३ हजार ६७३ शेतक-यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक इतर सर्व बाबींची पुर्तता केलेली असून त्यांचे केवळ ई-केवायसी करणे बाकी आहे. अशा शेतक-यांचे मुख्यत: सामाईक सुविधा केंद्रांमार्फत ई-केवायसी प्रमाणिकरण करण्यासाठी दि.२१ फेब्रुवारी पर्यंत आणखी १० दिवसांची संपृक्तता मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निर्देश दिले आहे. त्यामुळे मोहिमे दरम्यान केवळ ई-केवायसी प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतक-यांनी आपल्या नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी यांचे मार्फत केवायसी प्रमाणिकरण पूर्ण करावे. शेतक-यांनी स्वत:चे ई-केवायसी प्रमाणिकर करण्यासाठी मोबाईवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र, पी.एम.किसान फेस अथेन्टीकेशन ॲप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा. पी.एम.किसान योजनेंतर्गत ई-केवायसी प्रमाणिकरण करणे, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे, बँक खाती आधार क्रमाकांस जोडणे या बाबींची पुर्तता करण्यासाठी शेतक-यांनी समक्ष हजर असणे आवश्यक आहे. बँक खाती आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतक-यांनी आपल्या सोईनुसार प्राधान्याने नजीकच्या पोष्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे. केंद्र शासन पी.एम. किसान योजनेचा लाभ अदा केलेल्या लाभार्थींनाच राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अदा देण्यात येईल. या दोनही योजनेच्या लाभासाठी दि.२१ फेब्रुवारी पर्यंत आवश्यक बाबींची पुर्तता मोहिमेदरम्यान करावी. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांच्या संपर्क साधावा, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी प्रभाकर शिवणकर यांनी कळविले आहे.

साहुर ग्रामपंचायत च्या वतीने गाव चलो अभियानांतर्गत गावात राबविले अभियान

दै.जनप्रभात

प्रतिनिधी शरद वरकड

आष्टी तालुक्यातील साहुर येथे साहुर ग्रामपंचायत च्या वतीने गाव चलो हे अभियान राबविण्यात आले भारतीय जनता पक्षाच्या वतीने सध्या तळागळातील लोकांच्या समस्या जाणण्यासाठी गाव चलो अभियान राबविण्यात येत आहे यात वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह गावातील शेवटच्या कार्यकर्त्यापासून प्रयत्न सुरू आहेत याच अभियानाचा एक भाग म्हणून आष्टी तालुक्यातील साहूर येथे साहूर ग्रामपंचायत



च्या वतीने गाव चलो अभियान राबवण्यात आलेले आहेत यामध्ये गावातील अनेक लोकांनी तसेच ग्रामपंचायत च्या वतीने गावामध्ये किराणा दुकानासह गावातील वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन हे अभियान राबविण्यात आले यामध्ये लोकांच्या काही समस्या असेल तर त्या सुद्धा जाणून घेतल्या शाळा, किराणा दुकान गोरगरिबांच्या घरी जाऊन तसेच अनेक ठिकाणी भेटी देऊन माहिती घेण्यात आली यामध्ये साहुर गावाचे नवनिर्वाचित सरपंच प्रकाशराव गायकवाड, उपसरपंच ढवळे ताई तसेच ग्रामपंचायत सदस्य गोपालराव गावंडे ,दीपक राव ढवळे ,सुरेश भाऊ अमझिरे , श्रीकृष्णाजी खिरडकर ,चेतन भाऊ भोरे ,विनोदराव घोरपडे, वंदूताई वरकड, भोरे काकू, रामचंद्रजी कुकडे ,दिनेश भाऊ वरकड व इतर नागरिक उपस्थित होते

नई किरण उपक्रम महिलांसाठी संजीवनी



दै.जनप्रभात

काटोल/प्रशांत पवार

जिल्हा परिषद नागपूर, उमेद व प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सौम्या शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्या मार्गदर्शनात नागपूर जिल्ह्यात 'नई किरण' उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत महिलांना पुन्हा एकदा त्यांचे राहिलेले शिक्षण पूर्ण करण्याची संधी प्राप्त झालेली आहे तसेच निरक्षर महिलांना साक्षर करणे, वर्ग ५ वी पूर्ण करणे व ज्या महिलांचे शिक्षण वर्ग ५ वी पास व १० वी नापास आहे. अशा महिलांना वर्ग १० वी पास करून त्यांचा आत्मविश्वास वाढविला जात आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील २५ गावांमध्ये कार्य सुरु आहे. तालुक्यातील गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण प्रकल्प अधिकारी, आरोग्य अधिकारी, तालुका व्यवस्थापक, उमेद व इतर अधिकारी सहकार्य करीत आहे. गावातील निरक्षर महिला घरचे काम पूर्ण करून सायंकाळी एकत्र येऊन बसतात तसेच स्वयंसेवक महिलांना अभ्यासात मदत करतात. या उपक्रमांतर्गत काटोल तालुक्यातील परसोडी गावाचे सरपंच श्री. कमलेशजी डोईजोडे यांनी परसोडी येथे सुरु असलेल्या रात्रीच्या वर्गाला भेट दिली. तसेच महिलांना पाट्या, पेन, नोटबुक व लेखन व इतर शैक्षणिक साहित्य दिले. त्यांनी या भेटीत महिलांचे मनोबल वाढविले. तसेच गावातील प्रत्येक महिला शिक्षित होऊन गावाच्या विकासात हातभार लावतील. तसेच परसोडी गावातील महिलांना सुद्धा या उपक्रमात सहभागी करून घेण्याचे ठरविले आहे. त्यांनी सर्व महिलांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी गावातील नागरिक श्री. अशोक शेंडे, श्री. शांताराम कुंभरे, पोलीस पाटील श्री. रुपेश देशभ्रतार, ग्रामपंचायत सदस्य श्री. करण डिग्रस्कर, अनिता वासनिक व श्री. रमेश कुसराम तसेच स्वयंसेवक वर्षा सूर्यवंशी, प्रज्ञा सूर्यवंशी, तसेच प्रथम संस्थेचे चंद्रशेखर पवार, गजानन सरोदे, मोनाली कोटजावळे उपस्थित होते. उपस्थित सर्व सदस्य व महिलांनी सरपंच श्री. कमलेशजी डोईजोडे यांनी वर्गाला भेट देऊन महिलांचे मनोबल वाढविल्याबद्दल त्यांचेआभारमानले.

रेकॉर्डब्रेक गर्दीने वडवणीत माता रमाई जयंती साजरी

जिवंत देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधले

दै.जनप्रभात

बीड जनप्रभात गितांजली लव्हाळे

:-दिनदुबळ्यांची माता, त्यागमुर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२६ वी जयंती वडवणीत रविवार दि.११ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील भिमनगर येथे सकाळी १० वाजता नगरसेवक अमोल आंधळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन मिरवणुकीला सुरुवात झाली. यावेळी रिपाईचे तालुकाध्यक्ष महादेव उजगरे, किशोर उजगरे, मल्हारी उजगरे, डॉ.सुखदेव उजगरे, नगरसेविका मिराताई उजगरे, उषाताई घाडगे, सरिताताई उजगरे, नंदाताई उजगरे, रंजना उजगरे व हजारोंच्या संख्येने महिला, पुरुष व लहान बालक, बालिका उपस्थित होते. नगरसेवक अमोल आंधळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन प्रत्यक्ष मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व लेझीम पथकांनी मिरवणुकीला वेगळीच शोभा आली होती. महिलां व लहान बालकांनी दिलेल्या गगनभेदी घोषणांनी वडवणी शहर दणाणून गेले होते. मिरवणुक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात आल्यानंतर वडवणी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसाट यांच्या हस्ते चौकाचे व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर ही मिरवणूक स्व.वसंतराव नाईक चौक, संविधान चौक, जिवाजी महाले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातून परत भिमनगर येथे पोहोचली. असेल त्या परिस्थितीत संसाराचा गाडा हाकून व प्रसंगी गौऱ्या विकुन माता रमाईने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी मदत केली. अशा त्यागमुर्ती माता रमाईचे स्मरण सतत आजच्या महिलांनी करावे. आणि संसाराचा गाडा चालवावा. अशा थोर व महान माता रमाईच्या चरणी कोटी प्रणाम करत जयंतीची सांगता झाली. याप्रसंगी हजारो जणांनी गोड जेवणाचा आस्वाद घेतला. सायंकाळी भीम, बुध्द व माता रमाईच्या गितांवर अनेकांनी ठेका धरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माता रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा शिलाताई उजगरे, उपाध्यक्षा शेषेकला उजगरे, वृंदावनी उजगरे, कलाबाई उजगरे, सागरबाई उजगरे, कौशल्याबाई उजगरे, शोभाताई उजगरे, अनुसया उजगरे, राहीबाई उजगरे, सिताबाई जाधव, छायाताई उजगरे इत्यादींनी परिश्रम घेतले.

दरवाढीसाठी घरात साठवून ठेवलेला कापूस शेतकऱ्यांसाठी ठरतोय मनस्ताप



दैनिक जनप्रभात

प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपुर

समुद्रपूर : - कापसाचे दर हमीभावाच्या आत असल्याने दरवाढीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांचा कल सध्या साठवणुकीकडे जात आहे. मात्र, यामध्ये नवे संकट ओढवले असल्याने, कापसात बोंडअळीचे पतंग अन् कीटक तयार होत आहेत. याशिवाय लाल रंगात डेकूण, माईट्स किडीचा प्रादुर्भाव बंदिस्त परांत वाढला आहे. त्यामुळे शेतक-यांच्या परिवारातील सदस्यांच्या अंगावर खाज, पुरळ येत असल्याच्या तक्रारी आता बाढू लागल्या आहेत. यंदा कपाशीच्या सरासरी उत्पनात घट आलेली आहे. त्यातच बोंडअळीचा कहर झाल्याने कवड्या वाढत आहेत, असे असताना कापसाला हमीभावही मिळत नाही. यंदा केंद्र शासनाने कापसाला मध्यम ते लांब दर्जानुसार ६,६२० ते ७,०२० रुपये क्विंटल असा दर जाहीर केला आहे. बाजारात मात्र ६,५०० ते ६,८०० रुपयांपर्यंत विक्री होत आहे. मात्र, शासन खरेदी सुरू नसल्याने अनेक शेतकयांनी दरवाडीच्या प्रतीक्षेत कापसाची साठवणूक केली आहे. भाव वाढतील अशी आशा शेतकऱ्यांना असल्याने भविष्यातील आर्थिक गरजा ह्या यातून पूर्ण होण्यास मदत होईल असे या मागील आराखडे आहेत. परंतु या परिस्थितीत शेतक-यांसमोर नवे संकट उभे ठाकले असल्याने. साठवलेल्या कापसात किडी तयार होत आहेत व त्यामुळे परीवारातील सदस्यांना खाज, पुरळ आदी त्रास होत आहे. मागील वर्षीदेखील हा त्रास झाला होता मात्र, मार्च पश्चात याचे प्रमाण वाढले होते. जिनिंगमधील कामगारांनाही याचा त्रास बदल्याच्या तक्रारीत येत आहेत.या वर्षाला जानेवारीतच हा त्रास वाढल्याने दरव्वाढीच्या प्रतीक्षेत कापसाची साठवणूक करायची की किडींच्या त्रासामुळे मिळेल त्या भावात कापूस विकायचा, असा शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. या किडीवर कोणता उपाय आहेत याची चर्चा शेतकऱ्यांत होत आहे. यातून सध्या कोणताच मार्ग निघत नसल्याने ते दुहेरी संकटात सापडले आहेत. स्वतंत्र साठवणुकीची गरज कापूस बंदिस्त घरात अनेक दिवस साटविल्याने कापसात लाल रंगीत ढेकूण, माईट्स आदी किडींचा प्रादुर्भाव होतो. लाल रंगीत ढेकूण रुदंमधून रस शोषण करतात. त्यामुळे प्रतवारी खराब होते व कापूस पिवळा पडतो. तसेच कापसाच्या गंजीत काही दिवसांनी कीटकांची उत्पत्ती होते. यामधील कीटक चावल्याने अंगावर पुरळ येतात व खाज सुटते माईट्समुळे हा प्रकार होतो. त्यामुळे कापसाची स्वतंत्र खोलीत किंवा गोदामात साठवणूक करावी,

पुसागोंदी शाळेतर्फे आशा करनाके यांचा सत्कार

कर्मचारी क्रीडा स्पर्धेत सुयश

दै.जनप्रभात

नरखेड प्रतिनिधी /१३फेब्रुवारी

जिल्हा परिषद,नागपूर द्वारा आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२४ अंतर्गत जि. प. उच्च प्राथमिक शाळा,पुसागोंदी येथील शिक्षिका कु. आशाताई करनाके यांनी १०० मी.दौड,लांब उडी, गोळाफेक या वैयक्तिक क्रीडा प्रकारात द्वितीय स्थान प्राप्त करून काटोल तालुक्याचा मान वाढविला. यानिमित्त जि.प.उच्च प्राथ.शाळा, पुसागोंदीच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला उपसरपंच अनार राठोड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. सुशीला राठोड, किसन चव्हाण, केंद्रप्रमुख निलकंठ लोहकरे, मुख्याध्यापक श्रीकृष्ण भोयर, सुनिल ठाकरे, वर्षा खळतकर,संगीता नानोटकर, कैलाश बारंगे उपस्थित होते. कर्मचारी व अधिकारी क्रीडा स्पर्धेत काटोल तालुका व्हॉलीबॉल संघ व रस्साखेच संघ स्पर्धेत उपविजेता तर गोळफेक स्पर्धेत गिरीष उईके यांनी प्रथम क्रमांक पटकविला. सर्व विजेत्यांचे अधिक्षक गणेश कापकर,केंद्रप्रमुख मोरेश्वर साबळे,सुनिल ठाकरे,दामोधर कुटे, सुनिल वंजारी, बंडू पारसे, गोंविद शेंडगे, राम राठोड, राजेश मथुरे, राजेंद्र बोरकर, रोशन सावरकर, गजेंद्र कोल्हे, माणिक नाईक,महेंद्र साव, गिरीष उईके, निलेश पोपटकर, सतिश ढबाले, सिद्धार्थ लांडगे,संजय ढवळे, राजेंद्र टेकाडे आदींनी अभिनंदन केले आहे.



अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळण्याबाबत.

आष्टी तहसीलदार यांना देण्यात आलेले निवेदन

दै.जनप्रभात

तळेगाव शामजी पंत

तळेगाव शेत शिवारा मध्ये दिनांक ११ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकाचे नुकसान झाले तसेच खरीप हंगामातील काही शेतकऱ्याच्या तक्रारी विमा कंपन्याकडे दाखल केले असता किंवा कॉल केले असता कोणताही प्रतिसाद निळत नसल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे, त्यात हे रब्बी पिकाचे नुकसान न सोसण्यासारखे झालेले आहे. तसेच शेत मालाला योग्य दरवाढ न मिळाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे, त्यात हे दिनांक ११ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या नुकसानी मुळे शेतकऱ्याचे कंबरडेच मोडले आहे, तरी सदर पिकांचे पंचनामे करून योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी असे निवेदन तहसीलदार आष्टी यांना देण्यात आले तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब वर्धा यांच्या माहिती करिता मा. उपविभागीय अधिकारी आर्वी यांच्या माहितीकरिता मा. तालुका कृषी अधिकारी आष्टी त्यांना सुद्धा निवेदनाच्या प्रतिनिफिक देण्यात आल्य निवेदन देताना शेतकऱ्याची उपस्थिती विवीन बामनरावजी पाचपोर किशोर संतोषराज शनोटकर अंकुश किशोर शनोटपुर- प्रभाकर मकर रातोपुर विनोद मधूकर रानोखुर हे शेतकरी उपस्थित होते



विद्यार्थ्यांनी घेतल्या जंतनाशक गोळ्या.

दै.जनप्रभात नरखेड प्रतिनिधी (ता.१३) महाराष्ट्र राज्यात मंगळवारी (१३ फेब्रुवारीला) १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या देण्यात आल्या. या वयोगटातील मुला- मुलींना जंतामुळे पोटदुखी, उलट्या, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे यांसह कुपोषण, वाढ खुंटणे आदी आजारांचा धोका असतो. त्यामुळे या वयोगटातील मुलांसाठी शिक्षण तसेच महिला व बाल कल्याण विभाग यांच्या समन्वयाने सप्टेंबर आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांत ही गोळी देण्यात येते. मंगळवारी जवळपास २ कोटी ८० लाख मुला-मुलींना १ लाख १० हजार ९४४ अंगणवाडी केंद्रे, १ लाख २७ हजार ८४९ शाळा व महाविद्यालयांमध्ये जंतनाशक गोळी देण्यात आली. त्यासाठी वैद्यकीय अधिकारी, शिक्षक व इतर संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. बुधवारी ज्यांना गोळी घेता आली नाही त्या मुलांना २० फेब्रुवारीला गोळ्या दिल्या जातील. अल्बेंडाझोल ही गोळी शासनाच्या वतीने मोफत दिली जाते. आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यासोबतच अंगणवाडी, शाळा, महाविद्यालयांतही या गोळ्या मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. जलालखेडा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ही मोहीम यशस्वी रित्या राबवण्यात आली जवळपास ९० टक्के मुला मुलींना या गोळ्या देण्यात आल्या असून राहिलेल्या मुला मुलींनी २० तारखेला या गोळ्या दिल्या जाईल. फोटो ओळी. विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या देताना आरोग्य सेवक लीलाधर पारीसे.



राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ

दै.जनप्रभात

वर्धा,दि.१३(जिमाका) : आरोग्य विभागाच्यावतीने केसरीमल कन्या शाळा येथे मुख्यकार्यकारी अधिकारी विश्वास सिद यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना जंतनाशकाच्या गोळ्या खाऊ घालून राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ करण्यात आला. यावेळी केसरीमल कन्या शाळेच्या प्राचार्य जयश्री कोटगीरवार, कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नागपूर प्राचार्य डॉ. श्रीराम गोगुलवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सचिन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज. पराडकर, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, महिला व बाल कल्याण अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, पर्यवेक्षिका धनिष्ठा बोरुटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात १ ते १९ वयोगटातील ६८ टक्के मुले असून त्यातील २८ टक्के मुलांना आतड्यामध्ये वाढणारे परजीवी जंतापासून धोका आहे. याचे प्रमुख करण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छता असणे हे आहे. या कृमीदोषाचा संसर्ग दुषीत मातीच्या संपर्कात आल्यामुळे सहजतेने होतो. बालकांमध्ये होणारा दिर्घकालीन कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण तर आहेच तसेच बालकांची बौध्दिक व शारीरीक वाढ खुंटण्याचे कारण ठरते. भारतात ६ महिने ते ५९ महिने वयोगटातील १० बालकांमागे ७ बालकांमध्ये रक्तक्षय आढळतो. व ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण जास्तही असु शकते. तसेच १५ ते १९



वयोगटातील ५६ टक्के किशोरवयीन मुलींमध्ये व ३० टक्के किशोरवयीन मुलांमध्ये रक्तक्षय आढळतो. बालकांमध्ये होणारा दिर्घकालीन कृमीदोष हा व्यापक आणि मुलांना कमजोर करणारा आहे. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण तर आहेच तसेच बालकांची बौध्दिक व शारीरीक वाढ खुंटण्याचे करण ठरते. यासाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात राष्ट्रीय जंतनाशक दिन वर्षातून दोनदा राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश हा १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुलांमुलींना शाळा व अंगणवाडी स्तरावर गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जिवनाचा दर्जा उंचावणे हा आहे. जिल्ह्यातील १ हजार ४८ शासकीय शाळा, २६७ शासकीय अनुदानित शाळा, ९ नगर पालिका शाळा, २१५ खाजगी अनुदानित अशा एकुण १ हजार ५३९ शाळा व १ हजार ६०६ अंगणवाडीतील बालकांना तसेच शहरी भागातील १३५ शाळा व १५० अंगणवाडीतील १ ते १९ वयोगटातील बालकांना व शाळाबाह्य बालकांना जंतनाशक गोळ्या खाऊ घालण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रा.ज. पराडकर यांनी केले. संचालन अंजली तिनघसे यांनी तर आभार कविता बकाले यांनी मानले. कार्यक्रमास जितेंद्र शिंदे, आरती मावकर, प्रशांत आदमने, सोज्वल उघडे, शेख हुसेन, शशिकांत अरसड, गजानन पिसे, आरोग्य विभागातील कर्मचारी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते

तेजस बहुउद्देशीय संस्थेने भुकेल्यांना अन्न व किराणा सामानाचे वाटप केले

दै.जनप्रभात
कामठी :-नंदू कोल्हे

तेजस बहुउद्देशीय संस्था गेली ४ वर्षे मोहीम राबवत आहे.ज्या लोकांना संस्था अन्न व किराणा पुरवत आहे त्यांनी उपाशीपोटी न उठता उपाशी झोपावे हा या मोहिमेचा उद्देश आहे. ही प्रतिज्ञा घेऊन शहरातील काही प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने आजपर्यंत कामठी व कन्हान परिसरात धान्य व किराणा साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. मानवतेच्या धर्मासाठी काम करणारी तेजस बहुउद्देशीय संस्था कामठी ही संस्था ज्यांना रेशन व किराणा साहित्य पुरवते त्यांना तेजस संस्थेच्या वतीने मदत केली जाते त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे, कोणताच आधार नाही, मात्र कामठी कँट सहयोगींच्या मदतीने त्यांना मदत करत आहे. संघटनेचे माजी उपाध्यक्ष महेंद्र भुतानी, नागपूरचे विदर्भ नेते सीए सुनील चोखारे, सीए शिल्पी तिब्रीवाल, तिवारी गॅस एजन्सीचे संचालक बबलू तिवारी, पोलीस निरीक्षक विजय मालचे, सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र उर्फ मोंटू भुतानी, राजू अग्रवाल जी.डी. टेक्सटाईल सेंटर कामठी. संस्थेचे उपाध्यक्ष मनोज बत्रा, संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष देविदास पेटारे, चंद्रशेखर अरगुलेवार आणि हर महा हे अन्न ज्यांना आधार नाही, अपंग, अंध, वृद्ध अशा लोकांना हे अन्नदान करतात. इ. दरमहा लोकांना १० किलो तांदूळ आणि १० किलो गहू आणि किराणा सामानाचे वाटप करते. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी



जयभीम चौक, भाजी मंडई, कुंभारे कॉलनी, कादर झंडा मशिदीच्या मागे, छोटी अजनी, कन्हान सत्रापूर येथे अन्नदान करण्यात आले. वाटप करताना संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पेटारे, मार्गदर्शक एम.ए.जब्बार, सदस्य नरेश शिंदे, सहकारी मित्र राजा संभोजी, रोहन खोब्रागडे शंकर बर्मन, संदीप क्षीरसागर उपस्थित होते.अरगुलेवार म्हणाले की, आधार नसलेल्यांची संख्या वाढत आहे. माझी विनंती मान्य करून भगवंताचे सेवक श्री अर्जुन उपासे हे नागपूर येथून संस्थेत रुजू झाले असून त्यांनी संस्थेला तन,मन,धनाने मदत करण्याचे आवाहन केले आहे. अरगुलेवार यांचे संस्थेत जल्लोषात स्वागत झाले आहे.

सैनिक कल्याण विभागामार्फत गट क पदांची पदभरती

अर्ज करण्याचे आवाहन

दै.जनप्रभात
नागपूर दिलीप येवले- : सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील सरळ सेवेची पदे भरण्यात येणार आहे. या पदांसाठी अर्ज करण्याचे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे. कल्याण संघटकांची ४० पदे, वसतीगृह अधीक्षक१७, कवायत प्रशिक्षक १, शारीरिक प्रशिक्षक निदेशक -१, गट क या पदाकरिता फक्त माजी सैनिक उमेदवाराकडून व वसतीगृह अधिक्षिका, गट-क -३ या पदाकरिता भारताच्या सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी आणि सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी उपलब्ध होऊ शकत नसतील तर सेवा प्रवेश नियमाच्या अटीची पूर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नी या उमेदवाराकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांपैकी १ पद हे अपंग संवर्गातून किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवाराकडून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता उपलब्धतेनुसार भरण्यात येईल.

भरती प्रक्रिया टी.सी.एस- आय. ओ. एन. यांचेमार्फत होणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवारांना वेब-साईट ऑनलाईन अर्ज www.mahasainik.mahaashta.gov.in या संकेतस्थळावर ठशलींळींशपींढरल येथे १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजतापासून ३ मार्च रोजी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहतील. त्यानंतर ही वेबलिंक बंद होणार आहे.

राष्ट्रवादी च्या माजी सभापती तथा विद्यमान पं.स सदस्य नीलिमा सतिश रेवतकर भाजपमध्ये

नरखेड तालुक्यात राजकीय भुकप अनिल देशमुख यांचे खंदे समर्थक सतीश रेवतकर भाजपात

दै.जनप्रभात
अतुल दंढारे/ नरखेड प्रतिनिधी ता १३

नरखेड तालुक्यातील भिष्णूर सर्कलच्या राष्ट्रवादीच्या माझी सभापती नीलीमा सतीश रेवतकर यांनी नुकताच भाजप पक्षात प्रवेश घेतल्याने नरखेड तालुक्यात चांगलाच झटका बसला आहे.पारडसिंगा यथे झालेल्या महिला मेळाव्यात नीलिमा सतीश रेवतकर यांनी राष्ट्रवादी पक्षाचा राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस तसेच प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे हे उपस्थित हाते. याप्रसंगी राष्ट्रवादीचे मा. पंचायत समिती सदस्य सतीश रेवतकर ,जिल्हा परिषद सदस्य समीर उमप युवा, सरपंच कृणाल ढबाले यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. आता भाजप सतीश रेवतकर यांना काटोल विधानसभा क्षेत्राची कोणती जवाबदारी देतील की जिल्हा परिषद तिकीट देतील काय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मा. सभापती नीलिमा सतीश रेवतकर यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून विकास होत आहे. तेव्हा आपल्या सर्कलचा विकास व्हावा या दृष्टीने आपण भाजपमध्ये प्रवेश केला. पक्ष सांगेल ते काम केले जाईल. मतदार संघाच्या समस्या शासन दरबारी मांडून सोडण्याचा प्रयत्न करू असेही ते म्हणाले.



आनंद मेळ्यात रमले विद्यार्थी पालक शिक्षक



दैनिक जनप्रभात
प्रतिनिधी दिनेश हालमंडगे

रामटेक:- तालुक्यातील जि प उच्च प्राथमिक शाळा आजनी येथे विद्यार्थ्यातील पाककलेला वाव देण्याच्या उद्दिष्टाने बाल आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद मेळाव्यात बहुतांश विद्यार्थ्यांनी आपल्याजवळील बचतीला दुप्पट कसे करता येईल याकरिता चढाओढ दिसली. कुणी आणली पाणीपुरी तर कुणी चविष्ट उपमा कुणी मिरची भजी तर कुणी बनवून आणला हलवा कुणी नुसतीच उकडलेली बोरं तर कुणी फक्कड कडक चहा शाळेचे मुख्याध्यापक गोपाल चौधरी यांनी सांगितले की हा आनंद मेळावा घेण्याचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच व्यावहारिक ज्ञान यायला हवे.गणितीय आकडेमोड करून खाद्य विक्री करताना मुलांना आपोआप व्यावहारिक हिशोब कळतो. या आनंद मेळा उपक्रमास शाळेचे उपक्रमशिल शिक्षक एन के राठोड, संजय निमजे,अनिता चव्हाण ,जयमाला वाहने,संविंदर मेशाम, गणराज नागपुरे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,चंद्रकिरण दमाहे सरपंच मनोज लिलहारे आवर्जून उपस्थित होते

पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी समिती नेमणार- कृषी मंत्री धनंजय मुंडे

दै.जनप्रभात मुंबई, दि. १३ : पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच इतर पर्यायांचा विचार करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा निर्णय कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.राज्यातील पीक विमा योजनेच्या अंमलबजावणी मधील अडीअडचणी दूर करून ही योजना अधिक प्रभावी पद्धतीने राबवण्याकरिता अथवा शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार करण्यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या मंत्रालयातील दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी आयुक्त प्रवीण गेडाम तसेच कृषी विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला चालू हंगामातील पीक विम्याचा आढावा घेण्यात आला. तसेच आधार लिंक अथवा इतर कारणांमुळे पीक विमा पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या नावांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालयांच्या बाहेर लावण्याची सूचना कृषीमंत्री श्री. मुंडे यांनी केली. चालू वर्षी शासनाने पीक विम्यासाठी भरघोस तरतूद केली. सन २०१६ नंतर सर्वात जास्त पीक विम्याचा लाभ चालू वर्षी शेतकऱ्यांना मिळवून दिला. तथापि, याबाबत वारंवार लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून तक्रारी प्राप्त होत असल्याने पिक विम्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर कराव्यात किंवा काही राज्यांनी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणाऱ्या अन्य पर्यायांचा विचार केला असून त्याची कार्यपद्धती, योजना व अंमलबजावणी यांचा अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठित करावी असे आदेश कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी दिले. या समितीची कार्यकक्षा व रचना याबाबत वेगळ्या सूचना निर्गमित करुन एक महिन्याच्या आत शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देशही मंत्री श्री. मुंडे यांनी दिले.

मौजे टेंभुर्णी पुनर्वसित गाव त्यात ,पिण्याच्या पाणी प्रश्नासाठी तीव्र लडा..;

शिवसेना(उ.बा.ठाकरे गट) व ग्रामस्थ यांच्या संयुक्तपणे १३/०२/२०२४ पासून पंचायत समिती समोर साखळी व आमरण उपोषण सुरूच

दै,जनप्रभात
उपसंपादक /राठोड रमेश पंडित

अहमदपूर:- अहमदपूर तालुक्यातील मौजे टेंभुर्णी तालुका अहमदपूर येथील गेले अनेक प्रश्न उपस्थित होताना दिसुन येत आहे नुकतीच स्मशानभूमीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात विषय झाला होता, त्या प्रमाणे उन्हाळा येण्यापूर्वी स्थानिक जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी दिवसापासून तेथील स्थानिक नागरिक व जनता यांना पिण्याचे पाणी हक्काने मिळावे याकरिता अनेक वेळी शासन दरबारी निवेदने आंदोलन इत्यादी मार्गाने मागणी करूनही शासनाने पाणी प्रश्न सोडवीत नाहीत किंवा प्रयत्न करताना दिसून येत नाहीत असे दिसून येत आहे

दरम्यान ग्रामस्थांनी दिनांक ९ जानेवारी २०२४रोजी गटविकास अधिकारी वरिष्ठ तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे पाणी मिळावे या संदर्भात पत्रव्यवहार केला गेला

२६ जानेवारी २०२४ रोजी अमरण उपोषण करणार अशा आशयाचे पत्र मा गटविकास अधिकारी अहमदपूर यांच्याकडे संबंधित ग्रामस्थ व अर्जदारांना दूरध्वनी वरून संपर्क करून आंदोलन मागे घ्यावेत आसे गटविकास अधिकारी यानी काही दिवसांमध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवू असे आश्वासन दिले गेले

परंतु एक महिना होऊन सुद्धा हि पाणी प्रश्न तीशी दिसत आहे म्हणून शिवसेना तालुका कार्यालय प्रमुख व पदाधिकारी यांनी व टेंभुर्णी गावातील ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने गटविकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांच्या कार्यालयासमोर ग्रामस्थ साखळी उपोषण व शिवसेना कार्यालय प्रमुख यांनी आमरण उपोषण करत आहेत. आज पहिला दिवस करण्यात आल म्हणून या संदर्भी विषयावर गटविकास अधिकारी येणाऱ्या दिवसात निर्णय घेणार का ...?

की ग्रामस्थांना आश्वासित करून उपोषना बाबत काय निर्णय घेणार हे पुढील दिवशी पाहणे अवचित त्याचे राहणार आहे

दरम्यान वेळी शिवसेनेचे तालुका कार्यालय प्रमुख सुभाष गुंडीले व तालुका पदाधिकारी या उपोषण स्थळी समावेत मौजे टेंभुर्णी गावातील सरपंच व समस्त ग्रामस्थ यांच्या समवेत गट विकास अधिकारी पंचायत समिती अहमदपूर यांच्या कार्यालया समोर साखळी उपोषण व आमरण उपोषण सुरू आहे आजचा पहिला दिवस समाप्त झाला तर पुढील दिवशी प्रशासकीय अधिकारी यांनी काय भूमिका घेणार हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे, त्यावेळी उपस्थित, अंगद सोळंके,रंगनाथ सोळंके, मेहबूब पठाण, महादेव शिंदे



,काशिनाथ सोळंके, बजरंग गायकवाड, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय सोळंके, धोंडीराम बडगिरे, अजय सुरनर, ओम गुंडरे, धोंडीराम सोळंके, बालाजी कासले, गणेश कासले, संभाजी शिंदे, चंदू कासले, विठ्ठल कासले, मारुती बिलापट्टे

प्रा.अवंतिकाताई रमेश लेकुरवाळे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याचे कामठी तहसिलदारांना निवेदन



दै.जनप्रभात
कामठी :-नंदू कोल्हे

दि. १० व ११ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या गारपीट मुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे झालेल्या नुकसाणीची पाहणी करण्याकरिता चिकना, भामेवाडा, आसलवाडा, जाखेगाव, वडोदा, खापा इत्यादी गावांच्या शेतपिकाची प्रा.अवंतिकाताई रमेश लेकुरवाळे यांच्या नेतृत्वात इतर जनप्रतिनिधिनी व प्रशासकीय अधिकारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. पाहणी करत असता असे आढळून आले की, गारपिटीमुळे चने, गहू, ऊस, मिरची पिकांचे तसेच भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचा सर्वे करून, पंचनामे करून सरसकट अहवाल त्वरित पाठविण्यात यावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच पिकविम्याची साईट बंद असल्याच्या तक्रारी आहेत. यावर त्वरित कारवाई करावी. अशा प्रकारचे निवेदन तहसिलदार कामठी यांना देण्यात आले. प्रसंगी प्रा. अवंतिकाताई रमेश लेकुरवाळे सभापती म.बा.क. जिल्हा परिषद नागपूर, दिशाताई चणकापुरे सभापती कामठी, दिलीपभाऊ वंजारी उपसभापती कामठी, आशीषजी मल्लेवार माजी उपसभापती कामठी, संभाजी गावंडे, अतुल बाळबुधे सरपंच केम, नंदकिशोर खेटमले माजी सरपंच, सचिन भोयर , सुधाकर ठवकर, अमोल भिवगडे, पंकज ढोरे, अर्जुन राऊत, चंद्रकांत ढोंगे, रामू डाबरे, दिनकर येंडे, शुधोधन मानवटकर, नितीन बांगडे, सीमा मानवटकर, विलास गावंडे, महेश केसरवाणी, कृष्ण गायधणे, दशरथ शेंडे, प्रदीप काळे, प्रमोद पटले, सतीश बरडे तसेच जिल्हा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, खंड विकास अधिकारी, पंचायत समिती कृषि अधिकारी आणि संबंधित पटवारी, सचिव आणि कृषि सहाय्यक व शेतकरी उपस्थित होते

कामठीत घाणीमुळे डासांचा उपद्रव

दै.जनप्रभात
कामठी : स्थानिक नगर पालिका प्रशासनाने शहरातील सांडपाण्याच्या नाल्यांची साफसफाई आणि उघड्यावर पडून असलेला कचरा उचलण्याकडे दुर्लक्ष केल्याने डास व घातक कीटकांचा उपद्रव वाढला आहे. शहरातील काही भागात सांडपाणी व कचऱ्याची दुर्गंधी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.घरांमधील सांडपाणी व्यवस्थित वाहून जाण्यासाठी शहरात नाल्या तयार केल्या असल्या तरी स्थानिक नगर पालिका प्रशासनाने या नाल्यांच्या साफसफाईकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या नाल्या कचऱ्यामुळे बुजल्यागत झाल्या असून, सांडपाणी वाहून जाण्यास अवरोध निर्माण होत असल्याने काही भागात नाल्यांमधील सांडपाणी रस्ते व मोकळ्या जागेवरून वाहताना दिसून येते. नाल्या आणि सांडपाण्याच्या डबक्यांमध्ये डासांची पैदास मोठ्या प्रमाणात



वाढत आहे.दुर्गंधीमुळे या भागात राहणाऱ्यांसह ये-जा करणाऱ्यांना गुदमरल्यागत होते. डास व घातक कीटकांमुळे नागरिकांना मलेरिया, डेंग्यू व तत्सम कीटकजन्य आजार होण्याची व त्यातून त्यांच्या आरोग्य व जीवितास धोका व्यक्त केली आहे. शिवाय, शहरात डास प्रतिबंधक औषधांची धुरळणी देखील केली जात नाही.

****

मॉडेल हायस्कूलची कु. उत्कर्षा प्रमोद घागरे निबंध स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम



कारंजा (घा.)प्रतिनिधी
सिद्धार्थ सोमकुवर

स्थानिक मॉडेल हायस्कूलची वर्ग ९ मधील विद्यार्थिनी कु. उत्कर्षा प्रमोद घागरे ही विद्यार्थिनी जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत वर्धा जिल्ह्यातून प्रथम आली आहे. जलशक्ती मंत्रालय , पेयजल आणि स्वच्छता विभागाच्या निर्देशान्वये जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद वर्धा द्वारा जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा, पोस्ट स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यापैकी निबंध स्पर्धेमध्ये मॉडेल हायस्कूल कारंजा येथील कु. उत्कर्षा जीवन घागरे हीचा ''पाणी आडवा, पाणी जिरवा'' या विषयावरील तिचा निबंध सर्वोत्कृष्ट ठरला आहे. व ती जिल्ह्यातून प्रथम पुरस्काराची मानकरी ठरली आहे. जिल्हा परिषद वर्धा येथे आयोजित बक्षीस वितरण समारंभामध्ये जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग द्वारा कु उत्कर्षा प्रमोद घागरे हिला प्रमाणपत्र, सिल्ड, शाल व प्रथम पारितोषिक २१ हजार रुपये रोख पैकी विभागून १०५००/ रोख पारितोषिक प्राप्त झाले आहे. तिच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा एडवोकेट शोभाताई काळे, संस्थेचे सचिव संदीप भाऊ काळे, कारंजा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री. विनोद कहारे, कनिष्ठ महा. विभाग प्रमुख मंजुषा देशमुख, वर्ग शिक्षक विनोद चाफले, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

नामस्मरण भक्तीचे महत्त्व



ग्रंथराज दासबोधातील नवविधा भक्तीनामक चतुर्थ दशकात समर्थ रामदासांनी विविध भक्तिमार्गाचे गर्णन केले आहे, महती सांगितलेली आहे. पण, यातील तिसऱ्या समासातील जो मार्ग सांगितला आहे, तो म्हणजे नामस्मरणाचा मार्ग. हा भक्तिमार्ग सर्व मार्गापेक्षा वेगळा, सोपा आणि शीघ्र फलदायी असा आहे.

नवविधा भक्तींमध्ये श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चना, वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन असे विविध प्रकार आहेत; परंतु यातील नामस्मरण भक्ती हा प्रकार सोडला, तर सर्व प्रकार हे परस्वाधीन आहेत. दुसऱ्यावर अवलंबून असे आहेत. त्यासाठी कसली तरी सज्जता असली पाहिजे. कसली तरी तयारी असावी लागते. वस्तू, व्यक्ती, काळ, वेळ यावर या सर्व अवलंबून आहेत; परंतु नामस्मरणाला कसलेही बंधन नाही. त्यामुळेच हा बंधमुक्त असा भक्तीप्रकार आहे. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांनी केवळ नामस्मरण या भक्तीचा प्रसार करूनच, हा मार्ग किती सोपा आहे हे दाखवून 'श्रीराम जयराम जयजय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करण्याची शिकवण दिली आणि समर्थाचा हा भक्तिमार्ग या शतकात सर्वत्र पोहोचवला.

श्रवण भक्तीमध्ये श्रवण करण्यासाठी कोणती तरी कथन करणारी शक्ती पाहिजे, वक्ता पाहिजे, कथाकार पाहिजे, कीर्तनकार पाहिजे. नुसती श्रवण करण्याची इच्छा असून चालत नाही, तर त्याची सिद्धता, तयारी पाहिजे. इथे परावलंबित्व आले. दुसऱ्यावर आधारित ही भक्ती झाली, पण नामस्मरणाचे तसे नाही. फक्त इच्छा व्यक्त केली की, लगेच नामस्मरण सुरू करता येते. त्यासाठी दुसरे कोणी असण्याची गरज नाही. त्यामुळे हा अत्यंत सोपा आणि चांगला मार्ग आहे.

कीर्तन भक्ती करायची म्हटली, तर त्यासाठी विशिष्ट प्रकारचा पोषाख आला, आसन आले. कुठेही जाऊन कीर्तन करता येत नाही. त्यासाठी विशिष्ट अशी जागा असली पाहिजे. ही सगळी सिद्धता असली तरच कीर्तन करता येते. कीर्तनकाराचा पोषाख असला, तरच ते करता येईल. जीन्स, टी-शर्ट घालून, फॉर्मल कपडे घालून कीर्तन केले, तर त्याला अर्थ राहणार नाही. साथीला पेटीवाला पाहिजे, तबलजी पाहिजे, हातात चिपळ्या पाहिजे, टाळ पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समोर श्रोता पाहिजे. इतके सगळे असले, तरच कीर्तन भक्ती करता येणार. नामस्मरणाचे तसे नाही. कसलीही तयारी नको. कसलीही सिद्धता नको. कसलाही पोषाख नको. कोणी समोर असण्याची गरज नाही. कसल्या साथीची गरज नाही. इच्छा झाली की, नामस्मरण भक्तीला सुरुवात करता येते. त्यामुळे अतिशय साधी सोपी आणि सहज साध्य असा हा भक्तिमार्ग आहे.

नामस्मरण भक्तीसाठी कसल्याही वेळेचे, काळाचे, स्थानाचे बंधन नाही. ज्याप्रमाणे आपल्याबरोबर आपला श्वासोच्छ्वास असतो, त्याप्रमाणे नामस्मरण करता येते. प्रत्येक क्षणी आपण नामस्मरण करू शकतो. जेवताना, खाताना, पिताना, झोपताना, चालताना काहीही बंधन न पाळता आपण नामस्मरण करू शकतो. भक्तीमार्गातील चौथा मार्ग म्हणजे पादसेवन भक्ती. ही पादसेवन भक्ती करण्यासाठी सद्गुरूचे, परमेश्वराचे पाय समोर असले पाहिजेत. पण, नामस्मरणासाठी असे कोणतेही बंधन नाही. समोर मूर्ती नको, पादुका नको, काही नको. फक्त आमच्या अंतरगातील राम आमच्या मुखातून त्याच्या नामाचे स्मरण करून घेतो, असा भक्तिभाव महत्त्वाचा. समर्थांनी आपल्या लोकांमध्येही म्हटले आहे. मुखी ग्रास घेता म्हणावे श्रीराम. म्हणजे जेवताना, खातानाही आपण नामस्मरण करू शकतो. अखंडित चिंतीत जावे, अशी ही नामस्मरण भक्ती असते. अन्य कोणत्याही भक्तीप्रकारापेक्षा नामस्मरण भक्ती ही त्यामुळेच सर्वांना भावते. यावर एक भक्तिसंप्रदाय निर्माण करण्याची ताकद आहे हे गोंदवलेकर महाराजांनी दाखवून दिले.

पाचवा भक्तीप्रकार हा अर्चन भक्ती आहे. म्हणजे देवतांची शास्त्रोक्त पूजा करायची. शास्त्रोक्त म्हणजे अगदी षोडशोपचार नाही, निदान पंचोपचारी पूजा करायची ठरवले तरी सिद्धता आली, तयारी आली. अगदी अभ्यंगस्नान नाही, निदान शूचिर्भूत होण्यापुरते स्नान करणे आवश्यक आहे. अगदी कडक सोवळे नाही, निदान धूतवस्त्र तरी नेसणे आवश्यक आहे. पूजेची सर्व तयारी पाहिजे, फुलं पाहिजेत, गंध, हळदी-कुंकू, अक्षता, अत्तर, उदबत्ती, निरंजन, समई पाहिजे, कापूर पाहिजे, नैवेद्य पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, समोर देवाची मूर्ती, प्रतिमा असे काहीतरी पाहिजे. यातील काहीजरी नसेल, तरी तो भक्तीप्रकार करता येणार नाही; परंतु नामस्मरणाचे तसे नाही. कसल्याही तयारीशिवाय आपण नामस्मरण करू शकतो. आजारपणात आंघोळ केलेली नसेल, तर तशा अवस्थेतही आपण नामस्मरण करू शकतो. कसल्याही सोवळ्या ओवळ्याची गरज नामस्मरणाला नाही.

सहावी भक्ती समर्थांनी वर्णन केलेली आहे, ती म्हणजे वंदन भक्ती. देवाला, संतांना, सज्जनांना वंदन करून आपली भक्ती करायची. पण, इथेही मूर्ती, व्यक्ती, काया, सगुण रूप याची गरज आहे. पण, नामस्मरण ही भक्ती म्हणजे निर्गुण निराकार अशा परमेश्वराचे स्मरण करून आत्मारामाला आळवता येते. आपल्या मनात, अंतरंगात असलेल्या परमेश्वराचे नामस्मरण करायचे आहे. इथेच नामस्मरण भक्तीचे श्रेष्ठत्व दिसून येते. भक्तींच्या मार्गात श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च- दुय्यम असा भेदभाव करता येत नाही, पण, सर्वांना बरोबर घेऊन जाणारा आणि सर्वांना साध्य होईल, असा भक्तिमार्ग म्हणजे नामस्मरणाचा. कारण, हा स्वावलंबी म्हणजे फक्त निर्धार आणि निश्चयावर, इच्छेवर अवलंबून असा मार्ग आहे. समर्थांनी सांगितलेला सातवा भक्तिमार्ग हा दास्यभक्तीचा आहे. पण, तो मार्ग पूर्ण करण्यासाठीदेखील कोणीतरी आपले दास्यत्व स्वीकारण्याची गरज आहे. ते नाहीच स्वीकारले, तर हा मार्ग अपूर्ण आहे. अशा कसल्याही बंधनांच्या पलीकडे असलेला भक्तिमार्ग म्हणजे, नामस्मरण भक्ती. याशिवाय सख्य भक्ती हा एक भक्तीचा प्रकार आहे. महाभारतात अर्जुन आणि कृष्णाची, सुदामा कृष्ण यांची भक्ती ही सख्य भक्ती. पण, भगवंताशी मैत्री करण्याइतपत पोहोचणे तितकेसे सोपे नसते. कारण, समोर तसा भगवंतासम सखा भेटला पाहिजे. म्हणजे इथेही परावलंबित्व आले. त्यापेक्षा नामस्मरणाची ताकद सोपी आणि मोठी आहे.

आत्मनिवेदन हा आणखी एक प्रकार समर्थांनी सांगितला आहे. आपल्या सगळ्या इच्छा, मनोकामना, प्रार्थना या देवाला सांगायच्या. त्याचे निवेदन करायचे; परंतु यामध्ये सतत परमेश्वराशी, देवाशी संवाद करण्यासाठी समोर साक्षात आपला तो राम आहे, अशी भावना तयार होणे आवश्यक आहे. अशाप्रकारे ताकद येण्यासाठी नामस्मरण ही पायरी फार महत्त्वाची आहे. कसल्याही तयारीशिवाय, सिद्धतेशिवाय आणि परावलंबित्व नसलेले नामस्मरण हा भक्तिमार्ग खूपच मोठा आहे. वेळ, काळ, स्थळ, वेश, ठिकाण या सगळ्याच्या पलीकडे जाऊन फक्त श्रद्धा या तत्त्वावर आधारित हा भक्तिमार्ग आहे.

स्वयंपाकघरात या दिशेला भाज्या ठेवा

वास्तुशास्त्रामध्ये कोणतीही वस्तू ठेवण्याची योग्य पद्धत आणि दिशा तपशीलवार सांगितली आहे. ज्यामुळे व्यक्ती वास्तुदोष टाळू शकतो. घरामध्ये भाज्या ठेवण्याची योग्य दिशा सांगितली तर स्वयंपाकघरात ठेवण्यासाठी योग्य जागा कोठे आहे, ज्यामुळे घरातील समस्यांपासून सुटका मिळू शकते आणि शुभ परिणाम देखील मिळू शकतात. याबाबत माहिती घेणे महत्त्वाचे आहे.

या दिशेला भाज्या ठेवा : जर तुम्ही स्वयंपाकघरात भाजी ठेवत असाल तर उत्तर-पूर्व दिशा सर्वात शुभ मानली जाते. या दिशेला देवांचाही वास असतो. त्यामुळे या दिशेला भाजी ठेवल्यास ही जागा रोज स्वच्छ ठेवावी. अन्यथा वास्तुदोष निर्माण होऊन अशुभ परिणामही होऊ शकतात. त्यामुळे या गोष्टींची विशेष काळजी घ्या.

जमिनीवर ठेवू नयेत फळं-भाज्या : अनेकदा असे घडते की भाज्या घरी आणल्यानंतर त्या जमिनीवर ठेवल्या जातात, परंतु हे टाळले पाहिजे. यामुळे वास्तुदोष होतो. त्यामुळे तुम्ही टेबलावर भाज्या ठेवा. यामुळे नकारात्मकता दूर होऊन घरात सुख-समृद्धी येऊ शकते.

पांढऱ्या रंगाच्या पिशवीत आणाव्यात भाज्या : भाजी विकत घेऊन घरी आणत असाल तर पांढऱ्या पिशवीत आणा. हे शुभ मानले जाते. यामुळे कलह आणि त्रासाची परिस्थिती कमी होते आणि चांगली बातमी देखील मिळते. याशिवाय घरातील रोग आणि दोषांपासूनही आराम मिळू शकतो. त्यामुळे पांढऱ्या रंगाच्या पिशव्यांमध्येच भाज्या आणा.

भाज्या धुवून ठेवाव्यात : अनेकवेळा असे घडते की भाजी आणताना त्या न धुता ठेवल्या जातात, त्यामुळे घरात सुख-शांती येत नाही. यामुळे राहू दोष देखील होऊ शकतो. अन्नपूर्णा देवीही नाराज होऊ शकते. त्यामुळे जेव्हाही तुम्ही भाज्या विकत घेत असाल तेव्हाच धुवा. यामुळे शुभ परिणाम मिळू शकतात.



नोकियासारख्या मजबुतीसह बाजारात येत आहे नवा स्मार्टफोन ब्रँड; तीन फोनची लाँचपूर्वीच दिसली झलक

कंपनीनं ऑफिशियल वेबसाइटवर आपले नवीन मोबाईल डिव्हाइस टीज केले आहेत. टिजरमध्ये फोनचे ब्लू, ग्रीन आणि पिंक कलर व्हेरियंट्स दिसले आहेत.



एचएमडी ग्लोबल आतापर्यंत नोकिया ब्रँडेड स्मार्टफोन लाँच करत होती. परंतु आता कंपनी एचएमडी ब्रँडेड मोबाईल डिव्हाइस लाँच करणार आहे, जे कंपनीनं अधिकृतपणे टीज करण्यास सुरुवात देखील केली आहे. एचएमडी ग्लोबलच्या अधिकृत वेबसाइटवर नवीन मोबाईल डिव्हाइसेसचे कथित टिजर समोर आले आहेत जे नोकिया लुमिआ सीरिजसारखे वाटत आहेत. कंपनी आपले नवीन स्मार्टफोन अफॉर्डेबल रेंजमध्ये सादर करणार आहे, अशी चर्चा आहे.

एचएमडी ग्लोबल स्मार्टफोन लवकरच मार्केटमध्ये सादर केले जाऊ शकतात. कंपनीनं ऑफिशियल वेबसाइटवर आपले नवीन मोबाईल डिव्हाइस टीज केले आहेत. यांची डिझाइन पाहून वाटत आहे की, कंपनी नोकिया लूमिया सीरिजसारखी डिझाइन असलेले स्मार्टफोन लाँच करू शकते. परंतु दाखवलेले डिव्हाइसच लाँच केले जातील अशी कोणतीही घोषणा कंपनीनं केलेली नाही. टिपस्टर रोलंड क्वांटनं आपल्या सोशल मीडिया हँडल एक्सच्या प्रोफाइलवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात कंपनीनं टीज केलेले हँडसेट दाखवण्यात आले आहेत. त्यानुसार हे फोन ब्लू, ग्रीन आणि पिंक कलर व्हेरियंट्समध्ये बाजारात येतील.

बारकाईनं पाहिल्यास फोनच्या मागे दोन वर्तुळाकार रिंग्स दिसत आहेत जे कॅमेरा मॉड्यूलमध्ये एलईडी फ्लॅशसह फिट करण्यात आले आहेत. आयताकृती कॅमेरा मॉड्यूलमध्ये हलकासा बम्प दिसत आहे. फोनचे किनारे वाटोळ्या आकाराचे आहेत. तसेच, फोन बॉक्स टाइप चेसिससह दिसत आहे ज्यात साइड माऊंटेड फिंगरप्रिंट सेन्सर मिळण्याची शक्यता आहे. फोटोमध्ये एक डिव्हाइस ट्रिपल कॅमेऱ्यासह देखील दाखवण्यात आला आहे. ज्यात व्हर्टिकली तीन कॅमेरा दाखवण्यात आले आहेत.

चार्जिंगसाठी डिव्हाइसमध्ये यूएसबी टाइप सी पोर्ट देखील मिळू शकतो. त्याचबरोबर ३.५मिमी हेडफोन जॅक देखील दिला जाऊ शकतो.

याआधी पण एचएमडी मोबाईलबद्दल लीक समोर आले आहेत, ज्यात हँडसेटचा कोडनेम एन१५९वी सांगण्यात आला होता. यात ड्युअल रिअर कॅमेरा युनिटचा समावेश देखील आहे, ज्यात ऑप्टिकल इमेज स्टेबिलाइजेशन (ओआयएस) सपोर्टसह १०८-मेगापिक्सलचा प्रायमरी रिअर सेन्सर देण्यात आला आहे. तसेच प्लास्टिक फ्रेमसह काळ्या आणि सियान कलर ऑप्शनमध्ये हा फोन येण्याची शक्यता आहे. फोनच्या मागे लोगो देखील एचएमडीचा असेल. कंपनी लवकरच या नवीन डिव्हाइसची घोषणा करू शकते.



मानेवर आलेले काळे डाग 'या' घरगुती उपायांनी करा दूर

महिला आपले सौंदर्य अधिक खुलून दिसण्यासाठी विविध उपाय करतात. खासकरून महिला आपल्या चेहऱ्याची फार काळजी घेताना दिसतात. मात्र चेहऱ्याची काळजी घेण्याच्या नादात मानेवरील डाग आणि चट्टे यांसाठी काय उपाय करायचे हे विसरून जातात. त्यामुळे फक्त चेहरा सुंदर असल्याने काही होत नाही. मानेवरील डागांमुळेसुद्धा तुमचे सौंदर्य कोमेजल्यासारखे दिसून येते. जशी तुम्ही चेहऱ्याची काळजी घेता त्याचप्रमाणे मानेची सुद्धा काळजी घ्यायला हवी. कारण बहुतांश वेळेस मानेवर आलेले डाग जाण्यासाठी खुप कालावधी लागत असल्याने त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे 'या' घरगुती उपायांनी गळ्यावर आलेले काळे डाग तुम्ही दूर करू शकता.

बटाट्याचा किस आणि लिंबू : गळ्यावरील काळे डाग तुम्हाला घरगुती पद्धतीने घालवायचे असल्यास त्यासाठी बटाट्याचा किस आणि लिंबू यांचे मिश्रण तयार करावे. हे मिश्रण गळ्यावर जेथे काळे डाग आहेत तेथे १५ मिनिटे लावून ठेवावे. तसेच हे मिश्रण धुतल्यावर मधाने काही मिनिटे त्या जागेवर मसाज करावे. असे केल्याने गळ्यावरील काळे डाग दूर होण्यास मदत होते.

बेसन आणि तांदळाचे पीठ : बेसन आणि तांदळाच्या पीठाचे मास्क बनवून ते काळ्या डागांच्या येथे लावून ठेवावे. तर कमीत कमी १० मिनिटं हा मास्क लावून ठेवल्याने हळूहळू काळे डाग पुसट होण्यास मदत होते. मात्र मास्क धुताना साबणाचा वापर करू नका.



घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या आणि पैशासाठी दिवस-रात्र कष्ट करणाऱ्या माणसाला स्वतःच्या तब्येतीची काळजी घेण्यासाठी देखील फुरसत नाही. त्यात बदलत जाणाऱ्या जीवनशैलीमुळे तसेच प्रवासासाठी आलेल्या दुचाकी, चारचाकी वाहनांमुळे लोक पायी चालणे जणू विसरूनच गेले आहे. मात्र यामुळे वजन वाढणे, स्थूलपणा येणे, वेगवेगळ्या आजारांना आमंत्रण देणे असे प्रकार या लोकांसोबत हमखास होताना दिसतात. मग डायटिंग करणे, जिम लावणे, अतिरिक्त चरबी घटविण्यासाठी गोळ्या खाणे असे अनेक उपद्व्याप करतानाही काही माणसे दिसतात. याचा कधी कधी शरीरावर उलट परिणाम झालेलाही पाहायला मिळतो. त्यामुळे या सगळ्यांमध्ये फिट राहण्यासाठी सर्वात उत्तम पर्याय म्हणजे ३० ते ६० मिनिटे चालणे.

बदलत्या राहणीमानाने लोक बऱ्याचशा आजारांच्या विळख्यात अडकले आहेत. यात हार्ट अटॅक, मधुमेह, डिप्रेशन यांसारखे आजार लोकांमध्ये पाहायला मिळतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला पायी चालल्याने कोणते आजार होण्याचा धोका टळू शकतो ते सांगणार आहोत.

रोज ३० ते ६० मिनिटे पायी चालल्याने या आजारांपासून राहाल दूर; आश्चर्यकारक फायदे ऐकून तुम्हीही व्हाल थक्क

- रोज ३० ते ६० मिनिटे पायी चालण्याने हार्ट अटॅकची शक्यता कमी असते
- रोज कमीत कमी १ तास पायी चालल्याने अतिरिक्त चरबी कमी होऊन वजन कमी होण्यास मदत होते.
- दिवसातून ३० मिनिटे पायी चालल्याने डिप्रेशनची शक्यता ३६ टक्के कमी असते.
- पायी चालल्याने मधुमेहाचा धोका २९ टक्के कमी होतो.
- सकाळी चालण्यामुळे सकाळच्या वातावरणातील शुद्ध ऑक्सिजनचा शरीराला पुरवठा होतो.
- आठवड्यातून २ तास चालण्याने ब्रेन स्ट्रोक शक्यता ३० टक्के कमी होते.
- चालण्यामुळे तणाव आणि चिडचिडपणा दूर होण्यास मदत होते.
- दररोज एक तास चालल्यास संधिवाताचा त्रास कमी होऊ शकतो, असं संशोधनातून समोर आलंय.
- चालण्यामुळे पचनक्रिया सुधारते, मलबद्धतेसारखे, पचनाचे विकार कमी होतात.
- नियमित चालण्यामुळे पाठीचे दुखणे, हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, श्वासाच्या त्रासावर नियंत्रण मिळवता येते.
- मोतीबिंदूची शक्यता देखील नियमितपणे चालण्यामुळे कमी होते. तसेच हाडे मजबूत करण्यास, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास रोज पायी चालणे फार फायदेशीर

सफेद केसांची समस्या दूर करण्यासाठी करा 'हे' घरगुती उपाय

लहान वयात केस सफेद होण्याची समस्या काही महिला आणि पुरुषांना जाणवू लागते. त्यामुळे अवघ्या लहान वयातच केस सफेद झाल्याच्या प्रकारामुळे आपण म्हाताऱ्यासारखे दिसतोय याची खंत वाटू लागते. त्यासाठी केसांवर विविध प्रकराचे उपाय केले जातात. तर बाजारातसुद्धा केस काळे करण्यासाठी केमिकलयुक्त रंग येतात. परंतु ते केसांसाठी फायदेशीर नसते.

त्याचसोबत काही आयुर्वेदिक दुकानांमध्ये नैसर्गिकरीत्या सफेद केसांवर उपाय करण्यासाठी पावडर किंवा रंग येतो. मात्र या गोष्टींपासूनसुद्धा तुम्हाला केसांची काळजी अधिक वाटत असल्यास घरगुती पद्धतीने उपाय करणे उत्तम ठरेल, तर 'या' घरगुती उपयांनी सफेद केसांच्या समस्येपासून दूर राहता येईल.

कांदा – कांद्याच्या रस आणि तेल यांचे मिश्रण करून ते केसांना लावल्यास त्यांची वाढ उत्तम होते. तसेच केस गळतीसुद्धा थांबते. त्याचसोबत सफेद होणाऱ्या केसांची समस्या हळूहळू कमी होण्यास मदत होते.

आवळा – असे मानले जाते की, आवळ्यामुळे केस अधिक मजबूत होतात. त्याचसोबत केस काळ्या रंगाची राहण्याससुद्धा फार मदत होते. त्यामुळे नैसर्गिक पद्धतींचे शॅम्पू किंवा तेलासाठी आवळ्याचा वापर केला जातो.

काळी चहा – एक कप पाण्यात काळ्या चहाची पाने उकळवून त्याचे पाणी केसांना लावावे. यामुळे केसांना काळा रंग येण्यासोबत केसांची खुंटलेली वाढ होण्यास सुरुवात होते. तसेच काळ्या चहामध्ये ॲन्टीऑक्सिडेंट गुण भरपूर प्रमाणात आढळून येतात.

कढीपत्ता – तेलात कुटलेल्या कढीपत्त्याची पाने टाकून ते केसाला लावावे. कढीपत्त्यामध्ये असलेल्या मेलॅनिन पिग्मेंट हेअर फॉलिकल होण्यापासून थांबवते. तसेच सफेद केस होण्याची समस्या दूर होते.

तर वरील घरगुती उपायांनी केस सफेद होण्याची समस्या तुम्ही दूर करू शकता. तसेच केसांना केमिकलयुक्त रंग लावण्यापासून स्वतःला दूर ठेवावे. त्याचसोबत केसांच्या वाढीसाठी तेल हा उत्तम पर्याय असल्याने आठवड्यातून दोन-तीन वेळा केसांना मसाज केल्याने त्यांची वाढ उत्तम होते.



ब्लडप्रेशर नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात करा 'या' भाजीचा समावेश



रंगाने पांढरा शुभ्र पण चवीला थोडासा कडवट असलेला मुळा या भाजीकडे आयुर्वेदिक औषधी वनस्पती म्हणूनही पाहिलं जातं. मुळा हे एक प्रकारचं कंदमुळ आहे. विशेष म्हणजे बाराही महिने उपलब्ध होणारा मुळा हा शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे. हृदयाशी संबंधित आजारामध्ये किंवा कोलेस्ट्रॉल रुग्णांसाठी मुळ्याचे सेवन लाभदायक आहे. चला तर मग जाणून घेऊयात मुळा खाण्याचे फायदे-

- मुळा खाण्यामुळे ब्लडप्रेशर नियंत्रणात राहतं.
- मुळ्याचे सेवन करावे.
- मूळव्याध कमी करण्यातही मुळा फायदेशीर आहे.
- मुळ्यात असलेल्या क ; जीवनसत्त्व, फॉस्फोरस, जस्त (झिंक) व बी-कॉम्प्लेक्समुळे त्वचाविकार दूर होतात.
- मुळा खाल्ल्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.
- मूत्राशयासंबंधी समस्या उद्भवल्यास मुळा नैसर्गिक औषधाचे काम करतो.
- कावीळ झाल्यास जेवणात मुळ्याचा समावेश करावा.
- मुळ्यामुळे रक्त शुद्ध होते आणि रक्तात ऑक्सिजनचा पुरवठाही सुरळीत होतो.

ग्रामपंचायत कार्यालयात पुलगावच्या ठाणेदारांची आकस्मिक भेट



दै.जनप्रभात

विरुळ आकाजी :- विरुळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात शुक्रवारी सायंकाळी पुलगाव येथील नवनियुक्त ठाणेदार प्रमोदजी बानबले यांनी निवडणूक बूथ च्या संदर्भात विरुळ ग्रामपंचायत ला भेट दिली त्यावेळी निवडणूक बूथ संदर्भात माहिती दिली यावेळी विरुळ ग्रामपंचायत ला पहिल्यांदा आल्याने त्यांचे ग्रामपंचायत च्या वतीने शाल श्रीफळ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी सरपंच दुर्गाप्रसाद मेहरे,ग्रामसेवक पीपी.खंडागळे, पत्रकार विनोद महाजन, पोलीस पाटील नीरज तुरके, अजय अऱ्हाटे,पोलीस कर्मचारी रवी रामटेके,उपस्थित होते.

****

रनाळा येथे तीन दिवसीय पुरुष- महिला खुले गट खासदार चषक राष्ट्रीयस्तर कबड्डी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

दै.जनप्रभात

कामठी, :-नंदू कोल्हे

तालुक्यातील रणाळा येथील सुभाष क्रीडा मंडळाच्या वतीने तीन दिवशीय पुरुष –महिला खुले गट राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धेचे थाटात उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय स्तर खासदार चषक कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार कृपाल तुमाने यांचे हस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आले यावेळी युवा सेना महाराष्ट्र सचिव शुभम नवले ,जिल्हा शिवसेनाप्रमुख संदीप इटकेलवार, शिवसेना लोकसभा संघटक अमोल गुजर ,शिवसेना लोकसभा अध्यक्ष राज ताडेकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख विनोद सातंगे ,रनाळा ग्रामपंचायतचे सरपंच पंकज साबळे, उपसरपंच अंकिता तळेकर, माजी सरपंच देवराव आमधारे, माजी नगरसेवक लालसिंग यादव , उज्वल रायबोले,प्रा पराग सपाटे, स्वाती साबळे, ग्रामपंचायत सदस्य स्वप्निल फुकटे ,प्रदीप सपाटे ,अरविंद डोंगरे, सुनील चलपे ,मयूर गणेर, इंदू पाटील, सुनिता नंदेश्वर ,स्मिता भोयर ,आमिर खान ,मंगला ठाकरे ,अर्चना ठाकरे, सुनील मोहोळ ,सविता कुलरकर ,प्रशांत साबळे उपस्थित होते नागपूर जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील खुले गट पुरुष महिला कबड्डी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहेत कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना खासदार कृपाल प्रमाणे म्हणाले ग्रामीण



भागातील खेळाचा दर्जा उंचावण्याकरिता आपण रनाळा येथे राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे जम्मू ,दिल्ली ,हरियाणा ,पंजाब, राजस्थान, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, कर्नाटका सह देशाच्या कानाकोपऱ्यातून विविध राज्यातून आलेल्या पुरुष व महिला खेळाडूंनी खेळभावनेतून खेळून आपले कला गुण प्रदर्शित करण्याचे आव्हान केले पुरुष गट विजेता प्रथम पुरस्कार एक लाख ११ हजार रुपये, द्वितीय पुरस्कार ७५००० रुपये,तृतीय पुरस्कार ५१ हजार रुपये, महिला गट प्रथम पुरस्कार ५१ हजार रुपये ,द्वितीय पुरस्कार २५००० रुपये ,तृतीय पुरस्कार १५००० रुपये सह खासदार चषक प्रदान करण्यात येणार असून बेस रेडर, बेस्ट कॅचर, मॅन ऑफ द सिरीज चे वैयक्तिक पुरस्कार सुद्धा प्रदान करण्यात येणार आहेत प्रास्ताविक शुभम नवले यांनी केले संचालन सुचिता आंचलवार , नमरता आढावु यांनी केले आभार प्रदर्शन सरपंच पंकज साबळे यांनी केले कबड्डी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी माजी सरपंच देवराव आमधरे, प्रभाकर नवले, सुधाकर आमधारे ,गणपत गिरी ,सुनील चलपे, दिलीप गणेर, संजय मेंढे ,सतीश नवले, शेषराव आढावू ,विकास घाणेकर, देवेंद्र मोहोळ ,राकेश नवले ,मंगेश मुलमुले ,विलास गिरी ,कमलाकर नवले ,विशाल गिरी , रजत गिरी ,रोशन नवले ,अभिषेक गिरी ,चेतन मोहोळ, स्वप्नील खोब्रागडे, आकाश परतेकी, अभिलाष नितनवरे ,लोकेश यादव ,स्वयंम चलपे, उद्देश गिरी परिश्रम घेत आहेत

न्यू व्हिजन कॉन्व्हेंट हिंगणी मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम थाटात संपन्न

दै.जनप्रभात

सेलू . प्रशांत झाडे

हिंगणी येथील स्थानिक न्यू व्हिजन कॉन्व्हेंट मध्ये शाळेच्या प्रांगणामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक शिवबा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीन निघडे, उपाध्यक्ष मारोती चचाने,संस्थेचे कोषाध्यक्ष रुपेश ठाकरे, सचिव आशिष कांबळे,सहसचिव मंगेश काळे संचालक अंकुश समर्थ, ईशाक शेरवान, स्वनिल मुडे उपसरपंच ग्रा.प. हिंगणी, यावेळी मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण पण करून व नंतर दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व शब्दसुमनाने स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ठाकरे मॅडम व पूजा किरडे मॅडम यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांविषयी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचा आभार शाळेच्या शिक्षिका सौ शितल वाटकर यांनी मानले अशा प्रकारे उद्घाटनपर कार्यक्रमाचा समारोप करून सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली प्रथम गणेश वंदना या नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संस्कृतीचे प्रत्यक्ष या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे घडवून आणले यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सांस्कृतिक कार्यक्रमध्ये सहभाग घेऊन आपल्या सुप्त गुणांचे प्रदर्शन केले यावेळी गावातील पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षिका अश्विनी कांबळे, सेविका अर्चना ताई कुर्वे,पालक यांनी अथक परिश्रम घेतले.

****



वडोदा जिल्हा परिषद सर्कल मध्ये काँग्रेसला खिंडार

वडोद्याचे सरपंच राजू थोटे व केसोरीचे सरपंच प्रकाश महाकाळकर शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश



दै.जनप्रभात

कामठी :-नंदू कोल्हे

वडोदा- बीडगाव जिल्हा परिषद सर्कल मधील काँग्रेस पक्षाचे वडोद्याचे सरपंच राजू थोटे व केसोरी –अंबाडी गट ग्रामपंचायत चे सरपंच प्रकाश महाकाळकर आपल्या शेकडो सहकार्यकर्त्यासह प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश घेतल्याने वडोदा सर्कल मध्ये काँग्रेसमध्ये खिंडार पडल्याचे दिसून येत आहे.कामठी तालुक्यातील वडोदा येथे प्रदेश भाजप अध्यक्ष व विधान परिषद सदस्य चंद्रशेखर बावनकुळे यांचा गाव चलो अभियान असताना तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत समजल्या जाणाऱ्या वडोदा ग्रामपंचाय काँग्रेसचे सरपंच राजू थोटे व केसोरी –अंबाडी गट ग्रामपंचायत चे सरपंच प्रकाश महाकाळकर यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपा प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे उपस्थितीत प्रवेश केला प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व आमदार टेकचंद सावरकर यांनी सरपंच राजू थोटे प्रकाश महाडकर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा पक्षाचा दुपट्टा देऊन स्वागत केले यावेळी नागपूर जिल्हा भाजप अध्यक्ष सुधाकर कोहळे, अरविंद गजभिये ,डॉ राजीव पोतदार ,नागपूर जिल्हा भाजप महामंत्री अनिल निधान ,अनुराधा अमीन , कामठी तालुका भाजप अध्यक्ष उमेश रडके ,जिल्हा परिषद सदस्य मोहन माकडे उपस्थित होते पक्ष प्रवेश कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार असल्यामुळे गावाच्या विकासाकरिता आपण मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार आहोत सरपंच राजू थोटे व प्रकाश महाकाळकर यांनी गावाच्या विकासासाठी भाजपात प्रवेश केला आहे त्याकरिता विकास कामाकरिता आपण मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सुद्धा सांगितले प्रवेश या संदर्भात सरपंच राजू थोटे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की कामठी तालुक्यात काँग्रेसचे नेते गटागटात विखरले असून विकास कामासाठी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नाही गावाच्या सर्वांगीण विकास साच्या दृष्टिकोन ठेवून आपण प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,आमदार टेकचंद सावरकर यांच्या कार्यप्रणाली वर केंद्रित होऊन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण भाजपमध्ये प्रवेश केले असल्याचे मनोगत व्यक्त केले

****

राजरत्न पुरस्कार २०२४ जाहिर

दै.जनप्रभात

नागपूर, दिलीप येवले

श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (प्रथम) बहुउद्देशीय स्मारक प्रतिष्ठान आणि नागपूर ट्रस्टचे महाराज यांच्या वतीने आम्ही महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या नामवंत व्यक्तींची निवड करून राजरत्न पुरस्कार प्रदान केला आहे. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. आमचा हा प्रयत्न अंतिम ध्येयाकडे वाटचाल करत आहे. या संदर्भात माहिती देण्यासाठी आम्ही तुमच्यासमोर आलो आहोत.तुम्ही आम्हाला पूर्ण पाठिंबा दिला, त्यामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या अनेक नोंदी आमच्या आस्थापनापर्यंत पोहोचल्या. आमच्या आस्थापनेने ठरवून दिलेल्या मानकांच्या आधारे, ६ व्यक्ती आणि १८ वर्षांखालील २ मुलांची निवड समितीच्या सन्माननीय सदस्यांकडून येत्या काही दिवसांत निवड केली जाईल. राजरत्न पुरस्कार १४ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, वरिष्ठ भोंसला पॅलेस, महाल, नागपूर. आदर करणे. श्री. श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (प्रथम) स्मृती पुरस्कार संदीप पवार (मठ. पळशी, ता. कोरेगाव, जि. सातारा) यांना साहित्य आणि इतिहास क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल. श्रीमंत राजे मुधोजी महाराज उर्फ अप्पासाहेब भोंसले (द्वितीय) स्मृती पुरस्कार ओमप्रकाश शिव यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल. श्रीमंत राजेबहादूर रघुजी महाराज भोंसले (चतुर्थ) स्मृती पुरस्कार ओजस देवतळे यांना संगीत आणि गायन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी. पत्रकारिता क्षेत्रातील छायाचित्रकार आणि दूरचित्रवाणी ऑपरेटर म्हणून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीमंत जैन यांना श्रीमंत राजेबहादूर फत्तेसिंग महाराज भोसले स्मृती पुरस्कार. अनंत मुळे यांना विशेष कार्याबद्दल श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोंसले ऊर्फ चिमणाबापू स्मृती पुरस्कार, श्री. संजय भाकरे यांना श्रीमंत राजेबहादूर अजितसिंह महाराज भोसले स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.तसेच १८ वर्षांखालील मुलांसाठी क्रीडा क्षेत्रात डॉ. राघव साहिल भांगडे यांना श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज भोंसले स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कुमारी देवश्री रोशन नंदवंशी यांना त्यांच्या विशेष कार्याबद्दल श्रीमंत महाराणा प्रताप स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष जगद्गुरू रामनंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज (दक्षिणपीठ- नाणीजधाम) होते, कार्यक्रमाचे उद्घाटक पी.पी. आचार्य स्वामी श्री. जितेंद्रनाथ महाराज (श्रीनाथ पिठाधीश्वर, श्री देवनाथ मठ, सुर्जी अंजनगाव) व प्रमुख पाहुणे श्रीमंत राजे रघुजी भोंसले (वा.), अध्यक्ष- भोंसले प्रतिष्ठान उपस्थित राहणार आहेत.

नागरिकांच्या तक्रारींना वेळेत उत्तर देवून सुस्पष्ट मार्गदर्शन करा –विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी

दै.जनप्रभात

नागपूर दिलीप येवले- : विभागीय लोकशाही दिनात अपील अर्जांची संख्या कमी होवून तालुका व जिल्हास्तरावरील लोकशाही दिनातच नागरिकांच्या समस्या निकाली निघणे, ही लोकशाही दिन आयोजनाची सफलता आहे. मात्र शासकीय कार्यालयांनी नागरिकांना त्यांच्या तक्रारींवर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीसंदर्भात विहित वेळेत उत्तर देवून सुस्पष्ट मार्गदर्शन करावे, जेणेकरून त्यांना लोकशाही दिनात तक्रार करण्याची गरजच पडणार नाही, अशा सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज दिल्या. प्रत्येक महिन्यातील दुसऱ्या सोमवारी विभागस्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. त्यानुसार आज विभागीय आयुक्त कार्यालयात श्रीमती बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय लोकशाही दिनाचे



आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपायुक्त प्रदीप कुलकर्णी, पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) विजय माहुरकर व इतर विभागप्रमुख उपस्थित होते. विभागीय लोकशाही दिनात आज एकूण चार तक्रार अर्ज दाखल करण्यात आले. विभागीय आयुक्त यांनी संबंधीत तक्रारदारांकडून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या व पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन केले. प्राप्त सर्व तक्रारअर्ज पुढील १० दिवसात निकाली काढण्याचे निर्देश श्रीमती बिदरी यांनी संबंधीत विभागांना दिले. याप्रसंगी विविध विभाग प्रमुख व अधिकारी हजर होते.

सरस्वती इन्स्टिट्यूट मध्ये राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा

दै.जनप्रभात

कोराडी, दिलीप येवले- छत्रपती शाहू महाराज संस्थेद्वारा संचालित सरस्वती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोखारा तसेच सरस्वती भवन कॉन्व्हेंट अँड हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या संचालिका प्राचार्य सौ लता वाघ तसेच विज्ञान शिक्षिका प्रा. वैशाली नागपुरे प्रा. पौर्णिमा डोईफोडे प्रा. प्रीती बडीए प्रा. रवी भिसे यांनी विद्यार्थ्यांना जंत झाल्यामुळे होणारे दुष्परिणाम कुपोषण , रक्तक्षय यासारखे रोग होऊन वारंवार थकवा जाणवतो त्यामुळे जंत होऊ नये याकरिता जंतनाशक औषध घेणे किती महत्त्वाचे आहे हे सांगितले त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र गुमथी गुमथळा येथील मिळालेल्या जंतनाशक गोळ्या सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या . मुख्याध्यापिका चंचल चौबे मुख्याध्यापिका निशा फिलीपस उपमुख्याध्यापिका डॉ सुवर्णा जांभुळकर यांच्या निरीक्षणामध्ये सर्व विद्यार्थ्यांना गोळ्यांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा केल्यानंतर हा सप्ताह देखील आपल्याला साजरा करायचा आहे व जंत मुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाकरीता आरोग्य विभागाने केलेल्या आयोजनाचे सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी स्वागत केले.

जिल्हा युवा पुरस्कार सन २०२३-२४ करिता अर्ज आमंत्रित

दै.जनप्रभात

नागपूर, दिलीप येवले- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पूणे यांचे मार्फत राज्याचे युवा धोरण २०१२ शासन निर्णयान्वये जिल्हा युवा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. जिल्हयातील युवकांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रतीवर्षी १ मे रोजी महाराष्ट्र दिनी शासनामार्फत देण्यात येत आहे. करिता नागपूर जिल्हयातील युवक युवती व संस्थांनी सन २०२३-२४ करिता अर्ज सादर करावे. पुरस्काराचे नियम व अटी सोबत देण्यात आलेले आहे.

१. पुरस्काराचे स्वरुप :

जिल्हा युवा पुरस्कार जिल्हास्तरावर एक युवक, एक युवतीस, एक नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येईल. सदरच्या पुरस्काराचे स्वरुप गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार व्यक्ती रु.१०,०००/- (प्रती युवक व युवती) व संस्थेसाठी गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम रु.५०,०००/- अशा स्वरुपाचा असेल. पात्रतेचे निकष : अ) युवक व युवतीसाठी पात्रता निकष : अर्जदार युवक, युवतींचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रील रोजी १३ बर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्ष पर्यंत असावे. जिल्हा पुरस्कारासाठी जिल्हयात १० वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे. पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागातून दिला जाणार नाही. पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येणार नाही. केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफीती व फोटो ई.) अर्जदार युवक व युवतींचे पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रीयाशिल कार्यरत राहाणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार व्यक्तीचे कार्य हे स्वयंस्फूर्तीने केलेले असावे. एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक/ कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत अर्जदाराने पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला (संबंधित परिक्षेत्रातील पोलीस स्टेशन) देणे आवश्यक राहील. संस्थांसाठी पात्रता पुरस्कार संस्थेस विभागातून दिला जाणार नाही. संस्थांनी केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफीती व फोटो ई.) अर्जदार संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रीयाशिल कार्यरत राहाणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील. अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनीयम १८६० किंवा मुंबई पब्लीक ट्रस्ट अॅक्ट १९५० नुसार पंजीबध्द असावी. अर्जदार संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे. अर्जदार संस्थांचे कार्य हे स्वयंस्फूर्तीने केलेले असावे. एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी संस्था राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

अर्जदार तसेच संस्थेच्या सदस्यांचा पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला (संबंधित परिक्षेत्रातील पोलीस स्टेशन) देणे आवश्यक राहील पुरस्कार अर्ज सादर करताना खालील बाबींच्या कार्याचा उल्लेखाबाबत कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. पूचा व युवा विकासाचे कार्य करणा- पा संस्थानी केलेले कार्य दि.१ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीतील गत तीन वर्षातील कामगीरी विचारत घेण्यात येईल. युचा अथवा नोंदणीकृत संस्थानी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजीक कार्य राज्याचे साधन संपत्ती जतन व संवर्धन तसेच राष्ट्र उभारणीच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरणारे कार्य सामाजीक दुर्बल घटक, अनुसुचित जाती, जमाती व जनजाती आदिवासी भाग इ. बाबतचे कार्य शिक्षण, प्रौढशिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतीक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला समक्षीकरण, स्त्रीभुन, व्यसनमुक्ती तसेच पुर्वाच्या सर्वांगीन विकासासाठी केलेले कार्य राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देणारे कार्य नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानीक समस्या, महिला सक्षमीकरण इ. यावत कार्य, साहस इ. पावत कार्य. युवक युवती तसेच संस्थांनी पोलीस चारीत्र्य व वर्तणूक प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. वरिल निकषानुसार जिल्हयातील युवक युवती सन २०२३-२४ करिता १३ ते ३५ वयोगटातील (दि.३१/१२/२०२३ रोजी १३ वर्षावरील व दि.३१/१२/२०२३ रोजी ३५ वर्षाआतील असावा) संस्थानी सर्वोच्च कामगीरी केलेल्या युवानी व संस्थांनी दि. ०५ मार्च, २०२४ पर्यंत एक प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर येथे सिलबंद लिफाफ्यात अर्ज सादर करावे. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, नागपूर पल्लवी धात्रक यांनी केले आहे. तसेच अर्ज प्राप्त करून घेण्याकरिता कार्यालयीन वेळेत कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविले आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/2020/82242